म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय : नाटक
दा.क्र.: २३७७०
IRBK-0123770



# ती वेळच तशी हो

सुरेश

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
सरस्वती मंदिर, सुभाष पथ,
स्टेशन रोड, जिल्हा परिषदे समोर
ठाणे-४०० ६०१
दुरध्वनी - २५४०६७८७

# ती वेळच तशी होती

सुरेश खरे

प्रज्ञा प्रकाशन
अ/१५, ''शकुन'', शहाजी राजे मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.
दूरध्वनी : ६३४०९८१

IRBK-0123770

*'ती वेळच तशी होती' या नाटकाचे भाषांतर, रूपांतर, नभोनाट्य दूरदर्शन-नाट्य, चित्रपट, प्रयोग वगैरे सर्व हक्क. एस्के अॅन्ड असोसिएटस्, २-बी, स्टेला मारिस, सितलादेवी टेंपल रोड, माहीम, मुंबई - ४०० ०१६ यांजकडे आहेत. लेखी पूर्वसंमतीशिवाय या नाटकाचा किंवा त्यातील कोणत्याही भागाचा वापर केल्यास कायदेशीर इलाज करण्यात येईल.*

-सुरेश खरे

**प्रकाशक**
गिरीश दत्तात्रय गाडगीळ
प्रज्ञा प्रकाशन
विलेपार्ले (पूर्व)
मुंबई - ४०० ०५७

**प्रथमावृत्ती**
डिसेंबर, १९८९

**मुखपृष्ठ**
शैलेश तेंडोलकर

**मूल्य**
२८ रुपये

**मुद्रक**
व्यासा आर्टस्
शिवशक्ति इंडस्ट्रियल इस्टेट
मरोल, अंधेरी (पूर्व)
मुंबई - ४०० ०५९

-अनामिकेस

तू आलीस
आलीस आणि गेलीस
खूप काहींस देऊन.
आणि जाताना गेलीस
नकळत
खूप काहीसे घेऊनही
पण त्याची खंत नाही
कारण
**ती वेळच तशी होती**

*'ती वेळच तशी होती' या नाटकाचा प्रथम प्रयोग ।।श्री चिंतामणी।। या संस्थेतर्फे रविवार दिनांक ६ ऑगस्ट १९८९ रोजी सकाळी ११.०० वाजता गडकरी रंगायतन ठाणे येथे सादर करण्यात आला. त्यात भाग घेणारे कलावंत.*

अरूण - **अरूण जोगळेकर**

श्रीकांत - **विवेक लागू**

आशुतोष - **संदीप मेहता**

सुधा - **भारती आचरेकर**

सुनंदा - **जान्हवी पणशीकर**

प्राजक्ता - **सुषमा सावरकर**

बजाबा - **दत्ता राणे**

दिग्दर्शक - **राजन ताम्हाणे**

संगीत - **यशवंत देव**

रंगभूषा - **दिलीप कुडतरकर**

सहनिर्माता - **अप्पा कुलकर्णी**

नेपथ्य - **रघुवीर तळाशिलकर**

प्रकाश योजना - **अंबर भोसले**

वेशभूषा - **गुरूदास मयेकर**

सूत्रधार - **राजू नार्वेकर**

निर्माती - **लता नार्वेकर**

क्र. २३७५० २८/५/९० आ२९३

## अंक पहिला [दृश्य – १]

– एका सुसज्ज फ्लॅटची ड्राइंगरूम, वैभवाच्या खुणा जागोजाग दिसतात. एकूण सजावट अभिरूचिसंपन्न आणि रसिकतेची साक्ष देणारी. डावीकडे किचन-डोअर. उजव्या बाजूला दोन बेडरूम्स असाव्यात. सुधा– वय चाळीशीच्या आत-बाहेर पण दिसते पस्तीशीच्या आतली, देखणी, बाहेर येते. फोनचा रिसिव्हर उचलते –

**सुधा :** हॅलोऽ.... येऽस.... दॅटस् राइट.... विल यू प्लीज रिंग अप आफ्टर फाईव मिनीटस? ओ. के. आय विल आस्क हिम टु रिंग यू बॅक.... थँक यू मिस्टर कृष्णन.... वेलकम. (रिसिव्हर ठेवते आत जायला निघते. तिची मुलगी वय सुमारे १९ बाहेर येते.)

**प्राजक्ता :** कुणाचा फोन होता ममा?

**सुधा :** तुझ्याकरता नव्हता. पपांसाठी होता. (प्राजक्ता आत जायला निघते.) तुला कॉलेज नाही वाटतं आज?

**प्राजक्ता :** आहे तर! उशीरा जायचंय. पहिलं लेक्चर नाहीये (आत जाते.)

**सुधा :** (बेडरूमकडे जाते.... दाराशी....) ब्रेकफास्टला येताय ना? नऊ वाजून गेले. (आतून आवाज येतो 'आलोच दोन मिनीटांत') आयुष्यात कधी वेळेवर यायचे नाहीत. नेहमी उशीर.... (असं म्हणत आत जाते. थोड्याच वेळात बेडरूममधून अरूण वय सुमारे पंचेचाळीस - उमदं व्यक्तिमत्व - बाहेर येतो. टीपॉय वरचा फिनान्शियल एक्सप्रेस उचलतो. हेडलाईन पहातो आणि ब्रीफकेसमध्ये टाकतो. सुधा आतून येते.)

**अरूण :** नको आज. आय ॲम ऑलरेडी लेट. कॉफी आण फक्त.

**सुधा :** नेहमीचंच आहे हे तुमचं. बजाबा ऽ.. जरा कॉफी आणा बाहेर. कृष्णनचा फोन आला होता. त्यानं फोन करायला सांगितलाय.

**अरूण :** येऽस. (पॉकेट डायरी काढून फोन नंबर पहातो, डायल करतो.) हॅलो, मिस्टर कृष्णन् गुडमॉर्निंग... आ येऽस! इट्स कन्फर्म्ड. दीड वाजतां. सेन्टॉरला. आय वुड बी राइट देअर.... नाही नाही.... शुअर.... हंड्रेड पर्सेंट. ओ.के. सी.यू. फोन ठेवतो (बजाबा कॉफी आणतो. अरूण घाईघाईनं पिऊ लागतो.)

**सुधा :** जरा पाच मिनीटं बोलायला वेळ आहे का?

**अरूण :** आतांच बोलायला हवं कां?

**सुधा:** तुम्हाला वेळ असतो का कधी?

अरूण : (हंसत) बोला.... उगाच लेक्चर नको....

सुधा : वन्संचा.... पमाताईचा वाढदिवस आहे शुक्रवारी. पन्नासावा. काय घ्यायचं त्यांना?

अरूण : काहीतरी फालतू विचारतेस. दे कांहीतरी... शोभेसं....

सुधा : एरवी नसतं विचारलं. पण वन्सं नाहीतरी खटच आहेत. साडी दिली की काठ-पदर, पोत नाही बघणार.... किंमतीचं लेबल बघणार आणि आपण तें काढलेलं असलं की डायरेक्ट विचारणार.... कितीला पडली ग?

अरूण : जाऊ दे ग. तुला माहित आहे ना तिचा स्वभाव? तुला हवं ते आण. पैशाचा प्रश्न नाहीये. ती खूष झाली पाहिजे...

सुधा : बस्स ! शेवटी माझ्यावर ढकला. छानसं दिलं की 'भाऊ माझा चांगला.' आणि आवडलं नाही की 'वहिनीचं करणं असंच'

अरूण : माझ्या बहिणीचा उध्दार पुरे झाला आता. आणखी कांही....

सुधा : शनिवार–रविवारची म्युझिक फेस्टीवलची तिकटं काढतेय. टॉप आर्टिस्ट आहेत सगळे. भीमसेन, कुमार, किशोरी, प्रभा अत्रे....

अरूण : मी यायलाच हवं कां?

सुधा : मला वाटलंच होतं, नेहमीप्रमाणे तुम्ही हा प्रश्न विचारणार.

अरूण : ही सगळी मंडळी थोर आहेत. मला मान्य आहे. पण गाणं ऐकताना मला झोप येते त्याला मी काय करू? आणि मग झोपताही येत नाही आणि जागंही रहाता येत नाही अशी विचित्र परिस्थिती होते माझी.

सुधा : अगदीच कसे तुम्ही असे....

अरूण : त्याचं काय आहे सुधा, लहानपणी मला झोपवताना आई अंगाई गीत म्हणत असे. त्याशिवाय मी झोपत नसे असं सांगतात. तीच संवय भिनली आहे. गाणं म्हटलं की झोप..

सुधा . मग मी जायचं कुणाबरोबर?

अरूण : प्राजक्ताला ने बरोबर. ..

सुधा : तिला कुठयं वेळ.. ? ती आपल्याच नादात असते.

अरूण : मग तू असं कां नाही करत. .. श्रीकांतला विचार की. त्याला गाण्याची आवड आहे. मी फोन करू का त्याला.

सुधा : तुम्ही येणार नाही ना.. ? मग झालं तर. मी बघेन काय करायचं ते. जाओीन नाहीतर जाणार नाही.

अरूण : लगेच चिडतेस. बरं, बघतो मी. जमलं तर येईन उद्या सांगतो.

**सुधा :** थॅंक यू. बरं... आपली प्लेनची तिकीटं आली कां?

**अरूण :** आली....! सुधा, एक प्रॉब्लेम आहे. बहुतेक ती कॅन्सल करावी लागणार. अुटीचा प्रोग्रॅम नाही जमणार या वर्षी.. .

**सुधा :** या वर्षी काय? कित्येक वर्षात आपण मुंबईच्या बाहेर पाअूल टाकलं नाही. मला अगदी कंटाळा आलाय. इतकं आधी प्लॅन करूनही कां नाही जमणार या वर्षी....?

**अरूण :** अग एक नवीन ऑर्डर आलेय पाच लाखाची. १५ तारखेच्या आत पूर्ण करायची आहे. बिग मनी इज ॲट स्टेक. आय जस्ट कान्ट कम.

**सुधा :** ॲडजस्ट नाही करतां येणार?

**अरूण :** बिझनेसमध्ये कॉम्पिटिशन इतकी वाढलेय. नोबडी गिव्हज यू एनी ॲडजस्टमेंट. दे जस्ट कॅन्सल. आणि त्याना काय सांगू? बायकोला हिलस्टेशनला न्यायचंय म्हणून डिलीव्हरी डेट एक्सटेंड करा. कांहीतरी....

**सुधा :** (दुखावलेली. गप्प)

**अरूण :** जस्ट ट्राय टु अंडरस्टॅन्ड. मी हे मुद्दाम करीत नाही. पण मी ज्या व्यवसायांत आहे तिथं इटस जस्ट अनअव्हांइडेबल्. (तरीही ती गप्प) बघ.... बोलता बोलता दहा मिनीट गेली. आय मस्ट मेक मुव्ह. (ब्रिफकेस उघडतो, नोटांच बंडल काढतो. तिच्या हातात ठेवतो.) जस्ट कीप धिस.... स्पेन्ड ॲज यू लाईक. (जायला निघतो. पुन्हां मागे फिरतो.) फियाटच्या चाव्या दे जरा आज फियाट घेअून जाईन म्हणतो. (ती टेबलावरच्या चाव्या देते. तो तिच्या हातात दुसऱ्या चाव्या देतो.) तुला कुठं जायचं असेल तर मारुती घेअून जा. येअू मी? (जातो. अपसेट झालेली सुधा तो गेला त्या दिशेने पहात रहाते. वळते, किचनकडे जायला निघते आतून प्राजक्ता येते. बाहेर जायच्या तयारीनं)

**प्राजक्ता :** ममाऽ.... मला जरा यायला उशीर होईल.

**सुधा :** कां ग? कुठं मैत्रिणीकडे वगैरे जाणार आहेस की काय?

**प्राजक्ता :** नाही ग. . जरा लायब्ररीत बसणार आहे.

**सुधा :** तुझं हे वाचन पाहून मला कंटाळा आलाय. सारखं हातात पुस्तक, पुस्तक आणि पुस्तक. आणि तेही लाइट-रिडींग नाही. कंटाळा कसा नाही येत तुला? ही सारखी पुस्तकं वाचतेस म्हणून चष्मा लागला तुला.

**प्राजक्ता :** (थांबते, वळते, पुस्तकं टेबलावर ठेवते.) तुला काय म्हणायचय ममा? डोळयाना चष्मा लागेल म्हणून माणसानं वाचायचं नाही? कां डोळयाना चष्मा लागला म्हणून वाचायचं नाही?

सुधा : निदान कॉन्टॅक्ट लेन्स तरी लावीत जा.

प्राजक्ता : तुला मी हज्जार वेळा सांगितलं की कॉन्टॅक्ट लेन्सचा मला त्रास होतो. शिवाय त्या सांभाळायचाही कहार वाटतो. त्यापेक्षां चष्मा परवडला. कितीदा पडला, कुठंही हरवला तरी चालतो.

सुधा : अग पण....

प्राजक्ता : शिवाय ममा, मला तुझ्यासारखी चष्म्याची लाज नाही वाटत. आहे नंबर, लावते चष्मा. त्यात चोरी कसली?

सुधा : तू चांगली दिसावीस म्हणून....

प्राजक्ता : कुणी सांगितलं चष्मा लावल्यावर मी वाईट दिसते?

सुधा : अग पण नाही म्हटलं तरी नाजुकपणा कमी होतो. एवढ्या हौसेनं तुझं नाव प्राजक्ता ठेवलं...

प्राजक्ता : मला विचारून ठेवलंस? (सुधा चिडते. प्राजक्ता हसते.) काय आहे ममा, लहानपणी सगळीच मुलं इवलीशी आणि नाजुक दिसतात. सगळ्यांच्याच आया त्यांची नावं प्राजक्ता नाही ठेवत. आणि ममा, माझं नाव तू 'प्राजक्ता' ठेवलंस कारण तुला हे नाव अतिशय आवडतं. आणि दुसरं म्हणजे चारचौघींनी म्हणावं 'सुधाचं काय बाई, अगदी मुलीचं नाव ठेवण्यात सुध्दा रसिकता, अभिरूची दिसून येते' तुमची रसिकता दिसली की झालं मग आमच नाव वयाच्या आठ-नऊ वर्षापर्यंत आम्हाला नीट सांगता नाही आलं तरी चालेल. थँक गॉड, माझं नाव तू 'सुनेत्रा' नाही ठेवलंस. नाहीतरी मला काय काय ऐकून घ्यावं लागलं असतं, गॉड नोज.

सुधा : मी सांगितलेली एक गोष्ट तुला पटत नाही. टेनीस खेळायला का जात नाहीस क्लबवर?

प्राजक्ता : एक गेम खेळल्यावर मला धाप लागते. टेनीस कसलं खेळते? रॅकेटच्या हॅन्डलची जाडी माझ्या मनगटाएवढी.

सुधा : प्रत्येक गोष्टीला तुझ्याकडे कारण तयार असतं. आता एकदा सतार बंद झाली की सुटलीस.

प्राजक्ता : काळजी नको ममा, ती लवकरच बंद होणार आहे. मास्तरच कंटाळले आहेत. परवाच ते हंसत हसत म्हणाले, 'प्राजक्ता, सतारीच्या तारा वाजवायच्या नसतात, त्या छेडायच्या असतात.' आता बघ. इट इज अ क्वेशन ऑफ टाईम.

सुधा : तुला आता पटणार नाही. पण प्राजक्ता हे सारं करतेय ते मी तुझ्या चांगल्याकरतां.

**प्राजक्ता :** तुझ्या हेतूविषयी मी कधीच शंका घेतली नाही ममा.

**सुधा :** मग प्रॉब्लेम काय आहे?

**प्राजक्ता :** प्रॉब्लेम इतकाच आहे ममा, तुला ज्या गोष्टी चांगल्या वाटतात त्यात मला रस नाही. आणि मला ज्यात रस आहे त्या गोष्टी तुला चांगल्या वाटत नाहीत.

**सुधा :** हे बघ प्राजक्ता, मला ज्या गोष्टी चांगल्या वाटतात किंवा ज्या गोष्टी तू कराव्यास असं मला वाटतं, ज्याचा मी आग्रह धरते त्या तुझ्या पुढील आयुष्याचा विचार करून.

**प्राजक्ता :** पुढील आयुष्याचा नाही, लग्नाचा....

**सुधा :** मग त्यात काय चूक आहे? चांगला नवरा मिळावा....

**प्राजक्ता :** चांगला नवरा म्हणजे काय ममा? (सुधा गप्प) दिसायला चांगला? पैशानं चांगला? शिक्षणानं चांगला की स्वभावानं? आणि असा सर्वगुणसंपन्न पुरूषोत्तम मिळायला मी कोण एवढी लागून गेले? आणि तूं सांगतेस ते सारं करून मला चांगला नवरा मिळेल अशी गॅरंटी देशील तूं? चांगल्या चांगल्या खूप गोष्टी शिकायच्या आहेत मला. पण त्या 'मी' चांगली व्हावे म्हणून! चांगला नवरा मिळावा म्हणून नाही. (सुधा गप्प) जाऊ दे ममा, डोन्ट गेट अपसेट.... चल ममा.... मी निघते आता. नाहीतर उगाच उशीर होईल. तूं घरीच आहेस ना? कां कुठं जाणारायस?

**सुधा :** मी कुठं जाणार? घरीच आहे मी. फार उशीर करू नको ...

**प्राजक्ता :** ओ. के. ममा... बाय.... (पुस्तकं घेऊन जाते. सुधा ती गेली त्या दिशेनं क्षणभर पहात बसते. उठते. किचनकडे जायला निघते. थांबते.... क्षणभर विचार करते.... टेलीफोनशी येते. रिसिव्हर उचलते. पुन्हा क्षणभर विचार करते. डायल फिरवते.)

**सुधा :** (फोनवर) हॅलोऽ.... मी सुधा. .. काय चाललंय? .... असं?. .. आज एवढा मोकळा वेळ कसा मिळाला? .. नाही मी एकटीच आहे. मग काय करताय... ? येताय? मी.... ? कां? घरी कुणी नाही वाटतं.... ? नाही तसं कांही नाही.... हरकत काय असायची? येते मी.... पण अर्धातास तरी लागेल. . ओ.के... सी.यू.... ! (फोन ठेवते. बेडररूमकडे जाताजाता....) बजाबाऽ.. . जरा फोन बीन आला तर घ्या. (सुधा बेडरूममध्ये जाते. बजाबा किचनमध्ये जातो. थोड्याच वेळात दारावरची बेल वाजते. बजाबा बाहेर येऊन दार उघडतो. दारात प्राजक्ता आणि तिचा मित्र आशुतोष)

**प्राजक्ता :** ममा कुठाय?

**बजाबा :** आत आहेत.... (किचनमध्ये जातो.)

**प्राजक्ता :** (आशुतोषला) अरे बैस ना.... (आशुतोष बसतो.) तुला आणखी पाच मिनींट जरी अुशीर झाला असता तरी मी तुला भेटले नसते. एकदम अचानक कसा आलास? अगदीच अन-एक्सपेक्टेड....

**आशुतोष :** सकाळपासून फोन करतोय.... लागेच ना....

**प्राजक्ता :** खरं ना? या फोनचे किती अुपकार आहेत नाही आपल्यावर? त्या बिचाऱ्याच्या नांवावर काही खपवा.... खपून जातय.

**आशुतोष :** एऽ नाही.... खरच फोन करत होतो.

**प्राजक्ता :** ओ. के.... ओ. के.... आय ॲक्सेप्ट. बोल काय काम होतं?

**आशुतोष :** सांगतो... सांगतो.... तुला एवढी घाई काय झालेय? कां एकदा काम सांगून टाक आणि जा इथून.... असं?

**प्राजक्ता :** तसं नाही रे.... तू असा अचानक आलास.... न बोलावता आलास.... म्हणून इतकं आश्चर्य वाटतंय.... ! अगदी सावकाश सांग. मला बिलकुल घाई नाहीये. त्यातून आज तू पहिल्यांदाच आलायस् घरी....

**आशुतोष :** म्हणजे दुसऱ्यांदा येईन त्यावेळी घाई करशील....

**प्राजक्ता :** तुझ्याशी ना बोलावं कसं तेच समजत नाही. तू ही कॉम्प्युटरची लाईन सोडून दे. तू चांगला वकील होशील.... बरं काय काम होतं? ओ.... सॉरी सॉरी.....

**आशुतोष :** जाऊदे. एकदा सांगून टाकतो म्हणजे तुला उगाच टेन्शन नको. तसं खास काही नाहीये पण आज संध्याकाळचं छोटसं गेट-टु गेदर पोस्टपोन केलय. बाकीच्यांना कळवलं फोनवर. तुझा फोन लागेना म्हटलं तू जर कॉलेजातून परस्पर आलीस तर उगाच तुला खेप पडेल. म्हणून मुद्दाम सांगायला आलो.

**प्राजक्ता :** ते चांगल केलंस. पण मला खेप नसती पडली....

**आशुतोष :** म्हणजे?

**प्राजक्ता :** कारण आजचं गेट-टु-गेदर मी विसरूनच गेले होते.

**आशुतोष :** छे! कमाल आहे तुझी... चक्क विसरलीस? आणि वर सांगतेयस?

**प्राजक्ता :** इथंच चुकतं रे माझं. माझ्यात तुमच्यासारखा 'कनिंगनेस' नाहीये. आता मी विसरले होते हे सांगायची काही गरज होती कां? पण सांगितलं खरं ते. मी म्हणायला हवं होतं, ''बरं झालं मुद्दाम सांगितलस ते. तुला खेप पडली पण माझा कित्ती त्रास वाचला. थॅंक्यू सो मच...'' की बस्स तूही खूष आणि मीही चांगली. मला ही डिप्लोमसी शिकायला हवी.

**आशुतोष :** काही नको तुझा हा बावळटपणाच मला खूप आवडतो.

**प्राजक्ता :** पुन्हा म्हण.... पुन्हा म्हण....

**आशुतोष :** गोल्डन वर्डस आर नॉट रिपीटेड.... (सुधा बेडरूममधून प्रवेश करते. बाहेर जायच्या तयारीत.)

**प्राजक्ता :** हे काय ममा.... बाहेर जायला निघालीस? पण तू जाणार नव्हतीस ना कुठे.... कुठं निघालीस? (आशुतोष सुधाकडे निरखून पहातोय.)

**सुधा :** (प्रश्नाचं उत्तर टाळत) हे कोण?

**प्राजक्ता :** हे....? अग.... हा.... हा आशुतोष.... (आशुतोष नमस्कार करतो.)

**सुधा :** आशुतोष....! प्राजक्ताच्या तोंडून ऐकलय तुमचं नाव....

**आशुतोष :** तुमची मुलगी मला तू म्हणते आणि तुम्ही 'तुम्ही' काय म्हणता?

**सुधा :** तुझे फोनही येतात.... बस ना.... काय करतोस तू....?

**आशुतोष :** कॉम्प्युटर इंजिनिअर आहे मी.

**सुधा :** गुड....!

**प्राजक्ता :** चार वर्षांपूर्वी ममाला इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअर ग्रेट वाटायचा आता तिला कॉम्प्युटर इंजिनिअर ग्रेट वाटतात. शी कीप्स् पेस विथ मॉडर्न टाइम्स यू नो?

**सुधा :** तुझ्याशी पण अशीच बडबड करते का रे ही?

**आशुतोष :** माझ्याशी पण....? साऱ्या दुनियेशी असंच बोलते ही. वाचन दांडगं आहे ना?

**सुधा :** मला तर बाई वैताग आलाय तिच्या वाचनाचा. तुला आहे का रे वाचनाची आवड?

**आशुतोष :** अजिबात नाही.

**सुधा :** मग सांग तिला जरा.

**आशुतोष :** का? वाचू दे की... उलट मला जे आवडत नाही ते दुसरं कुणी मन लावून करताना पाहिलं की मला आदर वाटतो.

**सुधा :** झालं.... आता काय बघायला नको. घरी कोण कोण असतं तुझ्या?

**आशुतोष :** आई.... वडिल.... धाकटी बहीण.... वडील एका मल्टीनॅशनल मध्ये जनरल मॅनेजर आहेत....

**सुधा :** छान! प्राजक्ता, एकदा सगळ्यांना आपल्या घरी बोलाव. म्हणजे जरा आणखी परिचय होईल. त्याला चहा वगैरे विचारलास की नाही कां आपली नुसती गप्पाच मारत बसणार आहेस....

**प्राजक्ता :** विचारते ना.. आताच तर तो आलाय. बोल काय घेणार?

**आशुतोष :** खरं सांगायचं तर काहीही नको.

**प्राजक्ता :** आणि खोटं सांगयचं तर....?

**आशुतोष :** तर काहीही चालेल....! (दोघंही हसतात.)

**प्राजक्ता :** बजाबा.... जरा चहा करा.... ममा तूं घेणार?

**सुधा :** नको मी निघाले आता.... तुम्ही बसा बोलत... ये रे पुन्हा..

**प्राजक्ता :** पण एवढी चालली आहेस कुठं?

**सुधा :** फार वेळ नाही लागायचा मला....

**प्राजक्ता :** मला ड्रॉप करतेस कां?

**सुधा :** नको. मला उशीर होईल. (जाते.)

**प्राजक्ता :** काय? कशी काय वाटली आमची ममा?

**आशुतोष :** छान आहे की....!

**प्राजक्ता :** तू तिला आवडलास, मी सांगते.

**आशुतोष :** कशावरून?

**प्राजक्ता :** ''प्राजक्ता, एकदा सगळ्याना घरी बोलाव'' यावरून. (बजाबा चहा घेऊन येतो.) काय हो थर्मासमध्ये चहा करून भरून ठेवला होता की काय?

**बजाबा :** गॅसवर किती वेळ लागणार? (चहा ठेऊन जातो.)

**प्राजक्ता :** घे रे.... (टेलीफोनची बेल वाजते.) एक मिनीट.... (फोन उचलते.) हॅलो.... नाही मी सुधा नाही.... मी त्यांची मुलगी.... प्राजक्ता.... हॅलो कोण.... श्रीकांत अंकल? नाही.... ममा नाही घरात.... आताच बाहेर गेलेय. मी कशी घरात म्हणजे....? हं.... म्हणून.... नाही चालले कॉलेजात.... ममाला काही निरोप....? ओ. के.... बाऽय (फोन ठेवते.) ममा म्हणजे कुठे सांगूनही जात नाही....

**आशुतोष :** श्रीकांत अंकल म्हणजे तुझे काका?

**प्राजक्ता :** नाही रे बाबा.... ही इज अवर फॅमिली फ्रेंड. खास करून ममाचे.

**आशुतोष :** कुठे रहातात ग हे?

**प्राजक्ता :** एवढी खोदून खोदून चौकशी चालवली आहेस?

**आशुतोष :** मला वाटतं मी त्यानं ओळखतो.

**प्राजक्ता :** शक्य आहे. तुझ्याच एरियात रहातात ते....

**आशुतोष :** प्रोफेसर आहेत ते....?

**प्राजक्ता :** करेक्ट...

**आशुतोष :** मग बरोबर प्राजक्ता.... नाही काही नाही....!

**प्राजक्ता :** काय सांगत होतास?

**आशुतोष :** काय ते आपलं.... विसरलो बघ....

**प्राजक्ता :** आठवलं की सांग ... मग निघूया आपण?

**आशुतोष :** निघू या.... (उठतो)

**प्राजक्ता :** थांब.... बजाबाकडे निरोप ठेवते.... ही ममा कुठं गेलेय कोण जाणे.... (बोलत बोलत किचनकडे जाते.)

**आशुतोष :** (स्वतःशीच) तुझी ममा कुठं गेलेय ते मला माहित आहे प्राजक्ता. या क्षणी तुझी ममा....

**[अंधार.... दृश्य समाप्त]**

## अंक पहिला [दृश्य — २]

— प्राध्यापक श्रीकांत यांच्या घराचा दिवाणखाना. सुव्यवस्थित, नीटनेटका मोजक्याच पण सौंदर्यपूर्ण वस्तू. उत्कृष्ट सजावट. रसिकतेची सूचक अशी कलापूर्ण मांडणी. —

**सुधा :** तरी मी म्हणत होते आमच्याकडे या.

**श्रीकांत :** आता मला काय स्वप्न पडलं होतं. ठाण्याजवळ मालगाडी डिरेल होईल. सेंट्रल रेल्वेच्या गाड्या ठाण्यापलीकडे जाणार नाहीत, आणि माझ्या बायकोचं डोंबिवलीला जाणं रद्द होईल.

**सुधा :** पण तुम्हाला कळलं कसं?

**श्रीकांत :** स्टेशनवरून फोन केला तिनं की मी जात नाहीये, तुम्ही घरीच थांबा.

**सुधा :** सांगायचं बाहेर जातोय म्हणून

**श्रीकांत :** कसं सांगणार? तू येणार होतीस ना! तरी लगेच तुझ्या घरी फोन केला, तुला कळवायला 'तू येऊ नकोस मीच येतो' म्हणून तर तू ऑलरेडी निघाली होतीस. म्हटलं आता जाऊ दे. काय व्हायचं ते होऊ दे.

**सुधा :** फोन....

**श्रीकांत :** प्राजक्तानं घेतला होता जाऊ दे.... इतक्या दिवसानी भेटतेस चार प्रेमाच्या गोष्टी बोलू या. (तिला जवळ घेतो)

**सुधा :** (हलकेच दूर जात) माझा तर मूडच गेलाय.

**श्रीकांत :** अशा बारीक सारीक गोष्टींनी मूड जाऊन कसं चालेल? असं व्हायचंच. तुला ना प्रत्येक गोष्ट तुझ्या मनासारखी व्हायला हवी असते. पण नेहमीच तसं नाही होत. एखादी गोष्ट नाही मनासारखी झाली तर झालेल्या गोष्टीतून मनासारख काय होईल, कसं होईल याचा विचार करावा माणसानं.

**सुधा :** मला नाही असं तुमच्यासारखं जमत. आज मला सारा वेळ तुमच्या सहवासात घालवायचा होता. इतकी आसुसले होते मी.

**श्रीकांत :** मग.... अजून वेळ नाही गेली.... आधी मला एक सांग अशी एकदम आठवण कशी झाली माझी?

**सुधा :** तुमचं मला माहित नाही पण मला मात्र तुमची नेहमी आठवण येते पदोपदी. नकळत गुंतत गेले मी तुमच्यात. कित्येकदां रात्री मी शरीरानं अरूणच्या मिठीत

असते पण मनानं मात्र तुमच्या मिठीत असते. क्षणभर माझी मला लाज वाटते पण क्षणभरच. मनाला नाही आवरतां येत. माझं काही चुकतय कां?

**श्रीकांत :** कुणीतरी आवडणं यात अपराधी वाटायचं काही कारण नाही.

**सुधा :** आपलं हे, 'आवडणं' इतकच मर्यादित आहे? त्यापलीकडे कांही नाही....?

**श्रीकांत :** आवडण जसं आपल्या हाती नाही तसं किती आवडणं हेही नाही. एऽ आपण फार सिरीयस होतोय. एवढं सिरीयस व्हायचं काही कारण नाही. आपण कुठंतरी जाऊया. नक्कीच तुझा मूड परत येईल.

**सुधा :** म्हणजे एखाद्या हॉटेलात....

**श्रीकांत :** मग काय झालं.... ?

**सुधा :** मला फार टेन्शन येतं.

**श्रीकांत :** कधी कधी तुझं मला समजतच नाही बाहेर 'टेन्शन' येतं घरी अपराधी वाटतं! मग कुठं कसं भेटायचं? प्रेम कसं करायचं? सांग ना.... तुझ्यासारख्या रसिक बाईनं कसं बिनधास्त असायला हवं. कुठच्याही सौदर्याचा उपभोग माणूस टेन्शनखाली नाही घेऊ शकत आणि सौदर्य म्हणजे शारीरिक नाही तर साहित्य, संगीत, कला यातील सौदर्य सुध्दा. आधी एक सांग.... एकदम आठवण कशी झाली?

**सुधा :** बस्. तुमचं बोलणं नुसतं ऐकत रहावं. बरं, एकदम आठवण कशी झाली हवं होतं ना? कालच सुरेश भटांची एक गझल ऐकली. ऐकता ऐकता असं वाटत होतं तुम्हाला ती ऐकवायला हवी.

**श्रीकांत :** कोणती गझल?

**सुधा :** हा असा चंद्र अशी रात फिरायासाठी
तूच नाहीस इथे हात धरायासाठी

**श्रीकांत :** वा.... वाह.... क्या बात है.... संपूर्ण ऐकव....

**सुधा :** हा असा चंद्र अशी रात फिरायासाठी
तूच नाहीस इथे हात धरायासाठी
चेहरा तो न इथे ती न फुलांची वस्ती
राहिले कोण आता सांग झुरायासाठी
कालचे तेच फिके रंग नकोसे झाले
दे तुझे ओठ नवा रंग भरायासाठी
आडवी एक तिथे भिंत मनाची आली
दार होतेच कुठे आत शिरायासाठी.... हा असा चंद्र

**श्रीकांत :** वा.... वा.... मान लिया.... तूच नाहीस इथे हात धरायासाठी.... वा....!

आणखी काय.... दे तुझे ओठ नवा रंग भरायासाठी

सुधा : अरूणला पहिल्या दोन ओळी सांगितल्या

श्रीकांत : बरं मग?

सुधा : हेच म्हणाला 'बरं मग ?' म्हटलं 'कांही नाही कपाळ माझं'. त्याला गझल बिलकुल आवडत नाहीत. म्हणतो, 'गझल म्हणजे स्वतःच्या जखमा चिवडत बसणं'

श्रीकांत : कमाल आहे या माणसाची....

सुधा : तो म्हणतो फ्रस्ट्रेटेड माणसं वेदना कुरवाळत बसतात. यशस्वी माणसाना कुरवाळायला यश असतं स्वतःपाशी.

श्रीकांत : कम ऑन फरगेट अबाऊट इट....

सुधा : बरं मी निघू आता?

श्रीकांत : कां?

सुधा : सुनंदा कोणत्याही क्षणी येईल.

श्रीकांत : म्हणूनच तू जाऊ नकोस. तुला घाईघाईनं इथून बाहेर पडताना तिनं पाहिलं तर उगाच संशय येईल तिला. रिलॅक्स. उगीच ऑक्वर्ड न होता छानपैकी गप्पा मार तिच्याशी

सुधा : आणि कशाला आले होते म्हणून सांगू ?

श्रीकांत : गाण्याच्या प्रोग्रॅमची तिकीटं विचारायला....

सुधा : पण फोन कां नाही केला?

श्रीकांत : फोन डेड होता.

सुधा : यू आर रिअली कनिंग

श्रीकांत : डोन्ट से कनिंग.. से क्लेव्हर. (एकीकडे फोन करू लागतो.)

सुधा : काही म्हटलं तरी अर्थ तोच.

श्रीकांत : मी तुला हे सारं कां सांगतोय ट्राय टु अंडरस्टॅन्ड. माणसं जेव्हा मुद्दाम लपवण्याची धडपड करतात तेव्हां ती हटकून उघडी पडतात. आणि मग केविलवाणी होतात. नॉर्मल वागायचा प्रयत्न कर, अपराधीपणाची भावना काढून टाक म्हणजे मग काही म्हटल्या काही होणार नाही.

सुधा : तुमचं सगळं म्हणणं मला पटतं पण....

श्रीकांत : आता पण नाही बीण नाही. हॉटेल सफायर? हॅलो.... रिझर्वेशन प्लीज.... हॅलो ... एक रूम पाहिजे.. येऽस.... फुल आहे? .... एनी पॉसिबिलीटी?.... चालेल.... शक्यता आहे ना? मी श्रीकांत....! करेक्ट !

माझा नबंर आहे तुमच्याकडे बट यू नीड नॉट कन्फर्म.... इन एनी केस आय विल टेक अ चान्स. ओ.के. (टेलीफोन ठेवतो.) ॲज इट इज फुल आहे पण रूम मिळणाची शक्यता आहे. सुनंदा आल्यावर तू जराशा गप्पा मार. आधी तू बाहेर पड. थोडयावेळानं काहीतरी निमित्त काढून मी बाहेर पडतो. वुइ विल मीट ॲट हॉटेल सफायर ओ.के.? (दाराकरची बेल वाजते.) बहुतेक ती आलीच. वी नॉर्मल.... मोकळेपणानं वाग.... बघूया किती हुशार आहेस ते.... (दार उघडतो. सुनंदा प्रवेश करते.) म्हटलं नव्हतं मी तुम्हाला की ही येईलच इतक्यात म्हणून. जायला निघाल्या होत्या. मी थांबवून धरलं त्याना....

**सुनंदा :** बसा ना उम्या कां? (सुधा बसते.) आज इकडे कुठं?

**सुधा :** तुमच्याच कडे मुद्दाम आले. तुम्ही येऊ नका आमच्याकडे....

**सुनंदा :** खरंच जमत नाही हो....

**सुधा :** डोंबिवलीला जायला जमतं!

**सुनंदा :** सांगितलं वाटत ह्यानी. पण तेही नाही जमलं. रेल्वेनं सगळया बेतावर पाणी ओतलं. (दोघी हसतात.) तुम्ही पण काही काम असल्याशिवाय आला नाही.

**श्रीकांत :** अगदी खरं.

**सुधा :** मला आधी सांगा तुम्ही आज घरी कसे ऑड डे ला?

**श्रीकांत :** म्हणजे काय आम्ही काय ऑड डे ला घरी असू नये? काय झालं.... काल कॉलेज डे होता. त्याची आज सुटी. म्हणून घरी.

**सुधा :** पण ते बरं झालं नाहीतर मला कुलूप पाहून जावं लागलं असतं.

**सुनंदा :** काय ही गाडयाना गर्दी.... त्यातून हे रणरणतं ऊन. नको वाटतं कुठं जायला. माझी भाची असते डोंबिवलीला. तिच्या मुलाचं बारसं होतं आज. जायलाच हवं होतं.

**सुधा :** बरं बाई तुम्हाला सारं उरकतं.

**सुनंदा :** माणसांची हौस असली ना की सारं उरकतं. ह्याना कुठं यायला जायला नको

**श्रीकांत :** अग गिरगाव दादर ठीक आहे. डोंबिवलीला कुठं जायचं?

**सुनंदा :** कां? डोंबिवलीला कुणी जात नाही?

**श्रीकांत :** मी जात नाही.

**सुनंदा :** पुरे.... यांच्या देखत उगाच आपले वाद नकोत.

**सुधा :** असू दे हो त्यात काय मोठसं? आमच्याकडे 'हे' वाद घालायला पण घरी नसतात.

**सुनंदा :** बरं.... आता सांगा काम काय काढलत?

सुधा : गाण्याला येणार कां?

सुनंदा : कुणाचं गाणं?

सुधा : शास्त्रोक्त संगीताची मैफल आहे. मोठे मोठे आर्टिस्ट आहेत.

सुनंदा : कधी आहे प्रोग्रॅम?

सुधा : शनिवारी संध्याकाळी. चॅरिटी शो आहे.

सुनंदा : तिकींट फुकट जात आहेत कां?

सुधा : म्हणजे?

सुनंदा : तरच मी येईन. उगाच मुद्दाम तिकींट काढू नका. काय आहे मला झोप वगैरे येत नाही पण त्यातलं काही कळतही नाही. लोकानी वाऽ केलं की दहा सेकंदानी त्यांचं ऐकून आपण 'वा' म्हणायचं किंवा मठ्ठासारखं निर्विकार चेहरा करून बसायचं. त्याला काही अर्थ नाही. शिवाय मधून मधून यांची चमत्कारिक नजर सहन करायची. त्यापेक्षा घरी बसून टी.व्ही.वर मूर्ख मराठी चित्रपट पाहिलेला बरा. चित्रपट काढणारे मठ्ठ, दाखविणारे मठ्ठ आणि पहाणारे मठ्ठ ! सारा मठ्ठांचा कारभार. तुम्ही आपलं याना घेऊन जा. त्याना समजतं पण आणि समजल्याची ॲक्टींग पण जमते.

श्रीकांत : शेवटच्या वाक्यानं आमची धुलाई केलीत, धन्य झालात.

सुनंदा : धुलाई कसली? खरं ते सांगितलं. (सुधाला) तुम्ही खरंच माझं तिकीट नका काढू.

सुधा : नक्की नाही येणार?

सुनंदा : खरंच नको.... तुम्ही जरी नुसता फोन केला असता तर....

सुधा : फोन करून थकले लागला नाही म्हणून यावं लागलं....

सुनंदा : काही बिघडलं नाही.... त्या निमित्तानं आलात तरी.... बरं काय घेणार चहा कॉफी.... सरबत.... कां जेवून जाताय....?

सुधा : नाही.... जेवायचं वगैरे नको.... घरी जायलाच हवे....

सुनंदा : मग सरबत चालेल....?

सुधा : चालेल....

सुनंदा : तुम्ही घेणार कां हो?

श्रीकांत : घेईन यांच्याबरोबर....

सुनंदा : बसा.... आलेच मी. (आत जाते.)

श्रीकांत : गुड परफॉर्मन्स. सरबत घेतलंस की तू नीघ मी येतो

सुधा : लक्षात आहे माझ्या.

श्रीकांत : लॉजमध्ये वाट पहा.

सुधा : पण तुम्ही उगाच उशीर करू नका.

सुनंदा : (सरबताचे ग्लास घेऊन प्रवेश करीत) उशीराचं काय म्हणत होता?

सुधा : अंऽ म्हणत होते घरी डायरेक्ट गेलं पाहिजे. उशीर होईल.

सुनंदा : कोणी येणारय वाटतं....

सुधा : हं.... काही गेस्ट आहेत जेवायला दुपारी. (सरबत पिऊन होतं) मग निघू आता? बोलावल्याशिवाय मी आलेय. आता तुम्ही या.... ! कां अक्षत घेऊन यायला पाहिजे?

सुनंदा : छे छे.... येईन की

सुधा : बरं.... येते मी.... अच्छा.... (जाते.)

सुनंदा : सुधाताई आज जरा रेस्टलेस होत्या नाही....?

श्रीकांत : असं....? मला नाही कुठं तसं वाटलं....

सुनंदा : नक्कीच.... !

श्रीकांत : कशावरुन.... ?

सुनंदा : नेहमीपेक्षा जास्त मोकळेपणानं त्या बोलत होत्या.

श्रीकांत : आणि म्हणून तू....

सुनंदा : होऽ.... तुम्हाला नाही समजायचं ते. काही प्रॉब्लेम आहे कां?

श्रीकांत : कुणाला?

सुनंदा : अर्थात् त्याना. काही बोलणं झालं तुमचं?

श्रीकांत : छे ग.... तू यायच्या आधी पाचच मिनीट ती.... त्या आल्या होत्या. आमचं जुजबी बोलणं होतं न होतं इतक्यात तू आलीस. काही प्रॉब्लेम बिब्लेम कांही नाही. तुझं आपलं काहीतरीच.

सुनंदा : ठीक आहे.... काहीतरी तर काहीतरी. बरं अमोलला पैसे ट्रान्सफर केलेत कां? कां विसरलात? तिकडे तो वाट पहात असेल.

श्रीकांत : कांही वाट पहाणार नाही. त्याला माहित आहे आपला बाप आळशी आहे. तो पैसे संपायच्या आतच टेलीग्रॅम करतो. त्याचं हे इंजिनिअरीगचं शेवटचं वर्ष संपलं की सुटलो.

सुनंदा : सुटीत येणाराय का नाही कोण जाणे.... चार दिवस आला तर बरं... हे काय.... तुम्ही कुठं आता निघालात? सबंध दिवस घरीच बसणार होता ना?

श्रीकांत : हो पण आता बेत बदलला. जरा लायब्ररीत चक्कर टाकून येतो.

सुनंदा : मला जरा शॅपिंग करायचं होतं

श्रीकांत : संध्याकाळी बाहेर पडू की...

सुनंदा : मग तसे लवकर घरी या...

श्रीकांत : डोन्ट वरी. लवकर येतो. उशीर करीत नाही. (तो जातो सुनंदा क्षणभर दारापाशी थांबते. आता जायला निघते. इतक्यात टेलीफोनची बेल वाजते. ती टेलीफोन उचलते.)

सुनंदा : हॅलो... येस... फ्रॉम व्हेअर? हॉटेल सफायर... येस... करेक्ट.... प्रोफेसर श्रीकांत... करेक्ट... त्यानी रूम रिझर्वेशनकरतां फोन केला होता.... केव्हा... अर्ध्या तासापूर्वी.... काय मेसेज? रूम इज अॅव्हेलेबल. डोन्ट वरी.... येस येस... ही मस्ट बी ऑन हिज वे....

सुनंदा : (फोन ठेवते. शांतपणे किचनकडे जाऊ लागते. पुन्हा परत फिरते. टेलीफोनकडे येते... डायल फिरवते.) हॅलोऽ.... सुधाताई आहेत घरात? मी त्यांची मैत्रीण बोलतेय नाहीयेत... केव्हा येणार आहेत?... एकदम संध्याकाळी...? निरोप ना... काही नाही.... (शांतपणे फोन ठेवते. विचारमग्न.)

[अंधार.....दृष्य समाप्त]

# अंक पहिला [ दृश्य – ३ ]

– अरूणच्या फ्लॅटचा दिवाणखाना. त्याच दिवसाची रात्र. दुरदर्शनचे कार्यक्रम संपल्याची घोषणा. सुधा टी. व्ही. ऑफ् करते आणि बेडरूमकडे जायला निघते. इतक्यात दारावरची बेल वाजते. ती दार उघडते. दारात अरूण. त्यानं ड्रिंक घेतलय. पण 'व्यवस्थित' आहे. थोडा टिप्सी पण शब्द आणि चालणं यावर व्यवस्थित कंट्रोल –

**सुधा :** किती उशीर केलात आज?

**अरूण :** क्लबवर गेलो होतो बऱ्याच दिवसानी.

**सुधा :** ड्रिंक झालेलं दिसतंय.

**अरूण :** हं थोडफार.

**सुधा :** जेवायचं असेल ना?

**अरूण :** नाही. भूक नाहीये. भरपूर खाणं झालंय. तुझं जेवण झालं?

**सुधा :** मघाशीच जेवून घेतलं मी.

**अरूण :** चांगलं केलंस. (कपाटातून बाटली काढतो ग्लास घेतो.)

**सुधा :** हे काय? झालंय ना क्लबवर? आता पुन्हा घरी.... (ग्लास घेते)

**अरूण :** ग्लास दे.

**सुधा :** (ग्लास देते. तो ड्रिंक तयार करतो.) जरा बेतानं...

**अरूण :** मला कांही म्हणालीस?

**सुधा :** म्हटलं जरा बेतानं....

**अरूण :** डोन्ट वरी. मी नाही जाणार लिमिटच्या बाहेर. बस की.... (ती बसते) आज दुपारी कुठं बाहेर गेली होतीस?

**सुधा :** (चमकते) नाही... घरीच होते की. तुम्ही फोन केला होता?

**अरूण :** बजाबान सांगितलं नाही?

**सुधा :** हं... तशी थोडावेळ बाहेर गेले होते. बजाबानं सांगितलं तुमचा फोन येऊन गेल्याचं ...

**अरूण :** खोटंच?

**सुधा :** म्हणजे...?

**अरूण :** मी फोन केलाच नव्हता (सुधा उठून जाऊ लागते. तो तिचा हात पकडून तिला बसवतो.). बैस ना. (ती टेन्स. बसते) कुठं गेली होतीस? मैत्रीणीकडे?

**सुधा :** होऽ...

**अरूण :** आज दुपारी कृष्णनबरोबर सेंटॉरला लंच अपॉइन्टमेंट होती पण आयत्या वेळेला कृष्णनचा फोन आला.

**सुधा :** (रिलीव्ह्ड्) काय कॅन्सल केली की काय?

**अरूण :** नाही. व्हेन्यू चेंज केला. त्याला सोयिस्कर पडावं म्हणून अखेर लंच घेतला हॉटेल सफायर मध्ये. (ती पुन्हा टेन्स. उठते, तो पुन्हा तिला बसवतो.) मध्येच उठून चाललीस? बैस ना. बाय द वे मैत्रीणीचं नाव काय तुझ्या? (ती गप्प) हॉटेल सफायरमध्ये कुणाला भेटायला आली होतीस?

**सुधा :** तुम्ही पाहिलंत मला?

**अरूण :** हुशार आहेस. मी काय पाहिलं, 'कितपत पाहिलं हे तू चाचपणार आणि त्यावर तुझं उत्तर ठरवणार. बरोबर ना? मी किती मुर्ख आहे असा तुझा अंदाज आहे? अंऽ? बोलना तुझ्या प्रश्नाचं उत्तर देणार नाही! तू सराईतपणे किती खोटं बोलू शकतेस ते तरी पाहू दे मला.... सांग कुणाला भेटायला आली होतीस? (आणखी खोट बोलण्यात अर्थ नाही हे तिला समजत.)

**सुधा :** श्रीकांत... श्रीकांतला....

**अरूण :** दॅटस् गुड. खरं बोलायला केलेली सुरूवात चालू ठेव. किती दिवस चाललंय हे? डू यू स्लीप विथ हिम?

**सुधा :** तुम्हाला वाटतं तसं नाहीये.

**अरूण :** मग कसं आहे? एक विवाहित स्त्री एका परपुरूषाला भेटायला हॉटेलात येते. ती दोघ एक रूम रिजर्व करतात ती गप्पा मारायला असं समजायचं मी....? डोन्ट्यू स्लीप विथ हिम? (सुधा गप्प) तुझ्या मौनाचा अर्थ मी होकारार्थी घेतो. ओह. नो... याचा अर्थ रात्रीमागून रात्री मी शृंगार करीत होतो तो एका शिळ्या उष्टावलेल्या शरीराशी. का... का तू केलस हे सारं? माझ्यात असं काय कमी आहे, मी तुझं काय कमी केलं म्हणून तुला त्या पुरुषाचा मोह झाला? तू फसवलंस मला.... सतत फसवत राहिलीस. तुला लाज कशी वाटत नाही.

**सुधा :** माझं त्यांच्यावर प्रेम आहे...

**अरूण :** प्रेम. ? हं...! परपुरूषावर? तू माझी बायको आहेस माझ्या मुलीची आई आहेस.

**सुधा :** म्हणून मी तुमच्या मालकीची वस्तू नाही.

**अरूण :** मग कुणाच्या मालकीची? स्त्री-स्वातंत्र्य वगैरे कल्पना गेल्या खड्डयात. मी

अमेरीकन नवरा नाही. माझ्या कल्पना सनातनी आहेत. तुझ्या शरीराच्या कणाकणावर माझी मालकी आहे. माझा हक्क आहे... माझा अधिकार आहे. तो कुणीही हिरावून घेतलेला मला चालायचा नाही.

**सुधा :** शरीर... शरीर आणि शरीर या पलीकडे कधी काही दिसलंय तुम्हाला? माझ्या मनाचा विचार केलाय तुम्ही?

**अरूण :** कसला विचार?

**सुधा :** हेच ते! कसला विचार? अन्न वस्त्र निवारा दिला की संपल सारं? त्याच्या बदल्यात स्त्रीनं शरीर दिलं की व्यवहार पूर्ण. मग त्या मनाची राखरांगोळी का होईना. या शरीराबरोबर एक सुंदर रसिक मन आहे ते कधी दिसलंच नाही तुम्हाला. माझ्या रसिक मनाची गळचेपी केलीत तुम्ही. मी नाही म्हणत माझ कौतुक करा. पण कधी उत्तेजन दिलत मला? स्वतःच्या जगापलीकडे तुम्ही कधी पाहिलंच नाहीत. तुमच्या यशाच्या धुंदीनं तुमच मन निबर झालं. तुम्हा मला सगळं दिलंत दिल नाहीत ते फक्त प्रेम. जे मला त्यांनी दिलं.

**अरूण :** तुमच्या मैत्रीला मी हरकत घेतली नाही त्याची परतफेड तू अशी केलीस?

**सुधा :** हं मी मुद्दाम केलेलं नाही. नकळत घडत गेलं सारं....

**अरूण :** आणि तू वहावत गेलीस....

**सुधा :** हो... मी वहावत गेले. पण एक सांगते शारिरिक आकर्षणामुळे मी त्यांच्याकडे नाही खेचली गेले. त्यांच्या रसिक मनाचं मला आकर्षण वाटलं. आमच्या मनाच्या तारा कुठंतरी जुळल्या, माझ्या आयुष्यातली पोकळी त्यांनी भरून काढली. आणि मग मनानं जवळ येता येता शरीरानं जवळ केव्हा आलो ते समजलंच नाही. अपरिहार्यपणे ते घडलं.... घडत राहिलं...

**अरूण :** आय सी.... तुझं बोलणं संपल असेल तर एक सांगू? (क्षणभर स्तब्धता.) तू निर्लज्ज आहेस. माणसाला मोह होतो पण तुला त्याची शरम नाही. तू जस्टीफिकेशन देतेयस. तुझ्या जस्टीफिकेशनमध्ये तथ्यही असेल कदाचित्. पण ती नंतर शोधलेली आहेत. प्रथम कृती करून नंतर जेव्हा माणसं त्याची कारणं शोधतात, तयार करतात तेंव्हा त्याला अर्थ नसतो. माझं चुकलं असेल. आपण धरून चालू.. बट देन यु शुड हॅव डिस्कस्ड विथ मी.

**सुधा :** केव्हां?

**अरूण :** अर्लीअर. नॉट नाऊ.

**सुधा :** काय डिस्कस करायचं? माझ्यावर प्रेम करा म्हणून.

**अरूण :** स्टॉप इट. डोन्ट रिडिक्युल मी. त्याचं तुझ्यावर प्रेम आहे? ओ. के. माझं तुझ्यावर प्रेम नाही, मी तुला प्रेम दिलं नाही असं तुझं म्हणणं. मी तुझ्या

रसिकतेची गळचेपी केली नाही? मी काय करायला हवं होतं? कामधंदा सोडून तुझ्याबरोबर जिथं तिथं नाचायला हवं होतं?

**सुधा :** यु शुड हॅव डिस्कस्ड धीस अर्लीअर.

**अरूण :** कधी बोललीस या विषयी माझ्याशी?

**सुधा :** तुम्हाला वेळ असतो कधी? माझ फ्रस्टेशन न बोलता समजायला हवं होतं तुम्हाला.

**अरूण :** पण नाही समजलं आणि तू सांगितलं असतं तर आकाश कोसळलं असतं?

**सुधा :** कधी? या घरात कित्येक वर्ष आपण व्यवहारापुरतं बोलतोय. सुखदुःखाच्या गोष्टी कधी बोलल्याचं आठवतंय तुम्हाला?

**अरूण :** आणि या साऱ्यावर उपाय म्हणून तू बाहेर एक यार शोधलास...

**सुधा :** किती गलिच्छ बोलताय तुम्ही?

**अरूण :** केलंस ते काय होतं? ते गलिच्छ नाही? गलिच्छ नव्हतं? तुझ्या वर्तनाचं मी कौतुक कराव अशी अपेक्षा आहे तुझी? स्वतःला कोण समजतेस तू? एक आदर्श परिपूर्ण पत्नी? तुझ्यात काही दोष नाही? काही त्रुटी नाहीत? पण म्हणून मी काय बाहेर बाया शोधत फिरायचं? सांग ना.. दे उत्तर. (क्षणभर स्तब्धता) तू माझ्या तुझ्यावरच्या विश्वासाचा अपमान केला आहेस. आणि सगळ्यात दुर्दैव म्हणजे तुला त्याची अजिबात खंत नाही. दोन घटका चोरून भेटून परस्त्रीवर उत्कट प्रेम करणं सोपं आहे. चोवीस तास एकत्र असलेली नवराबायको तसं प्रेम करू शकत नाहीत हेही तुला कळत नाही. कधीतरी केव्हातरी कळेल...! (क्षणभर स्तब्धता) एनी वे... यापुढे तुला चोरटेपणानं काही करायची गरज नाही...

**सुधा :** म्हणजे....?

**अरूण :** यू पॅक अप ॲन्ड गेट आऊट राईट नाऊ

**सुधा :** वॉट डू यू मीन?

**अरूण :** आय मीन वॉट आय से. यापुढे या घरात तुला स्थान नाही.

**सुधा :** तुम्ही शुद्धीत नाही. तुम्हाला चढलेय.

**अरूण :** मी प्यायलोय पण मला चढली नाही. मी अजूनही स्वच्छ विचार करू शकतोय. एक व्यभिचारी स्त्री पत्नी म्हणून मला या घरात नको आहे...

**सुधा :** तुम्ही काय बोलताय?

**अरूण :** ज्याला तू प्रेम म्हणतेस त्याला मी व्यभिचार म्हणतो. उष्ट्या पत्रावळी उकिरड्यावर फेकायच्या असतात. तुला या घरात जागा नाही. या क्षणी

इथून बाहेर पडायचं आहे.

सुधा : तुम्ही खरं सांगताय?

अरूण : कां? तुला अजून खोटं वाटतंय? तसं असेल तर हात धरून बाहेर काढतो. म्हणजे मग खरं वाटेल?

सुधा : आता मी यावेळी कुठं जाऊ?

अरूण : हा विचार व्यभिचार करताना करायचा असतो.

सुधा : असा तडकाफडकी निर्णय घेताना तुम्ही मागचा पुढचा विचार केलाय?

अरूण : त्याची गरज नाहीये...

सुधा : आपली बदनामी होईल त्याचं काय?

अरूण : बदनामीची फिकीर करायचं तुला कारण नाही. परपुरूषावरच्या प्रेमाची किंमत एवढी द्यावीच लागते. राहता राहिली माझी बदनामी. मी तोंड देईन त्याला. तू त्याची चिंता करू नको.

सुधा : प्राजक्ताचं काय.... तिला....

अरूण : तिची काळजी मी घेईन. बस्स... यापुढे अक्षरही न बोलता इथून चालती हो...

सुधा : प्लीज... तुम्ही जरा शांत व्हा. उद्या सकाळी आपण...

अरूण : तुझ्या सोयीप्रमाणे तुला घरातून घालवू ?

सुधा : तुम्ही माझं जरा ऐकून घ्याल कां?

अरूण : पुन्हा पुन्हा तीच स्पष्टीकरणं ऐकायची नाहीत मला. मला माहित आहे. एकीकडे तुला पैसा, वैभव, सुखासीन आयुष्य, स्टेटस, सुरक्षितता हे सारं हवय आणि दुसरीकडे तुझ्याभोवती नाचणारा रसिकराज पुरूषोत्तम हवाय, जो मी नाही. घरट्याची ऊब आणि आकाशाचं थ्रिल एकाच वेळेला कवेत घेऊ पहातेयस तू. मी नाही देऊ शकणार तुला ते. यू हॅव टु क्विट्.

सुधा : मी तुमची पत्नी आहे...

अरूण : नाऽही....! परपुरूषाशी संबंध ठेवणारी स्त्री माझी पत्नी नाही. तिला परस्त्री समजतो मी. आणि मी परस्त्री बरोबर संबंध ठेवत नाही. माझ्या पैशाच्या जोरावर तुझ्याहून सुंदर सतराशे छपन्न बायका खेळवल्या असत्या. पण साला मी पडलो विवाहसंस्था मानणारा एक भेकड, षंढ, क्षुद्र नवरा. मला माझी स्वतःची चीड येतेय. तू जा इथून... माझा तोल सुटायच्या आत तू माझ्या नजरेपासून दूर जा. गेट आऊट आय से.

सुधा : तुम्ही फार मोठा अविचार करताहात.

अरूण : अविचार करायचा मक्ता काय तुला एकटीला दिलाय?

**सुधा :** पण म्हणून त्याला उत्तरही अविचारानं का देताय? का एवढं टोकाला जाता? माझं चुकलं असेल... पाय घसरला असेल माझा. पण तुम्हाला वाटतंय तसं मुद्दाम नाही मी हे सारं केलं. प्रवाहात सापडले मी आणि ते घडून गेलं. आणि त्याबद्दल फार कठोर शिक्षा तुम्ही मला देत आहात. घरातून बाहेर काढून तुम्ही मला अशा वाटेवर आणून सोडताय जिथनं परत फिरायला कदाचित् मला मार्गच मिळणार नाही.

**अरूण :** संपलं? (क्षणभर स्तब्धता) नाऊ इफ यू डोन्ट लीव्ह धिस प्लेस विदीन अ मिनीट... (तो वळतो. त्याच्या नजरेतला ठाम निश्चय पाहून ती थिजते. हताश होते. तो एक पाऊल पुढे टाकतो. ती मागे सरते आणि वेगानं बाहेर पडते. तो क्षणभर तसाच उभा. टीपॉयकडे येतो. ड्रिंकनं ग्लास भरतो. आणि एका घोटांत पिऊन टाकतो. इतक्यात (बेडरूममधून प्राजक्ता प्रवेश करते)

**प्राजक्ता :** संपलं की नाही तुमचं डिस्कशन? किती जोरजोरात बोलत होता. पण, ममानं सांगितलं की नाही तुम्हाला? आशुतोषचे आईवडील उद्याच भेटायला. .. म्हणजे भेटायला असं नाही पण आपल्याकडे येणार आहेत. आशुतोष....

**अरूण :** कोण आशुतोष ..?

**प्राजक्ता :** म्हणजे ममानं सांगितलं नाही? ममाची सुद्धा कमाल आहे (बेडरूमकडे जात) ममाऽ... एऽ.. ममा...

**अरूण :** ममा घरांत नाहीये...

**प्राजक्ता :** 'घरांत नाहीये'? म्हणजे?

**अरूण :** तुझ्या ममाला पपानी घराबाहेर काढलं.

**प्राजक्ता :** काऽय? नाही नाही पपा. .! पण कां पपा? कां?

**अरूण :** तुझ्या ममाला पपा आवडत नाहीत तुझे पपा रूक्ष आहेत. अरसिक आहेत म्हणून ममानं दुसऱ्या पुरुषाला सर्वस्व दिलं तर पपानी काय करायचं?

**प्राजक्ता :** पण म्हणून ! काय केलंत हे पपा? अशा अवेळी ममा कुठं जाईल? काय करील ती?

**[अंधार..... दृश्य समाप्त]**

# अंक पहिला [दृष्य – ४]

— श्रीकांतच्या घराचा दिवाणखाना. त्याच दिवसाची रात्र.
बाराचा सुमार श्रीकांत पुस्तक वाचण्यात गढून गेला आहे.
सुनंदाचं विणकाम चालू आहे—

**सुनंदा :** काय झोपायचा विचार आहे की नाही? बारा वाजायला आले.

**श्रीकांत :** हे एवढं प्रकरण संपवलं की झालं. बस्स. चारच पानं राहिली आहेत नाहीतरी तुझं विणकाम चालूच आहे ना?

**सुनंदा :** ते काय कुठही थांबवता येतं. त्याला काही प्रकरणं नसतात.

**श्रीकांत :** प्रकरणाचं काय म्हणालीस तू?

**सुनंदा :** एवढा त्रासिक चेहरा करून काही विचारायला नको. तुमचं वाचन चालू दे. नाहीतरी मला झोप यायला लागलेय. एवढी बाही पूर्ण झाली की मी ठेवून देणार आहे. (दारावरची बेल वाजते.)

**श्रीकांत :** आता कोण आहे यावेळी? (श्रीकांत पुस्तक बाजूला ठेवतो आणि दार उघडायला उठतो. सुनंदाही विणकाम थांबवते. श्रीकांत दार उघडतो. दारात सुधा—)

**श्रीकांत :** तू... तुम्ही...? इतक्या रात्री? (तो गोंधळलेला) आणि एकट्याच? या ना... आत या... (सुधा आत येते.) बसाना. (ती बसते.) काही विशेष? (ती बोलत नाही. तो सुनंदाला) जरा पाणी आण.... (सुनंदा आत जाते. पाणी आणते. स्तब्धता. सुधा पाणी घटाघटा पिते. पुन्हा स्तब्धता.) बोला.. काय झालं असं? (सुधा सुनंदाकडे नजर टाकते. श्रीकांत सुनंदाला नजरेनंच आत जायला सांगतो. ती निमूटपणे आत जाते. ती आत गेल्यानंतर काही क्षणांनी.) काय झालं असं? एवढ्या रात्री तू कशी आलीस? सांग काय झालं?

**सुधा :** ह्यांनी मला घराबाहेर काढलं....

**श्रीकांत :** (शॉक्ड) अरुणनं?

**सुधा :** हो... नेसत्या वस्त्रानिशी.

**श्रीकांत :** पण असं काय घडलं?

**सुधा :** त्यानी आपल्याला पाहिलं. आज दुपारी तेही हॉटेल सफायरमध्ये आले होते. त्यांच्या क्लायंटबरोबर लंच घ्यायला.

**श्रीकांत :** पण तू त्यांना...

**सुधा :** रूम रिझर्वेशनसकट सारं माहिती आहे त्याना,

**श्रीकांत :** पण त्याला दुसरं काही स्पष्टीकरण...

**सुधा :** इतकं सोप नाही ते. अरूण श्रूड बिझनेसमन आहे. त्यानी मला खोटं बोलायची संधि दिली... मला खोटं बोलायला लावलं आणि नंतर प्रत्येक खोटं एक्स्पोझ केलं.

**श्रीकांत :** त्याला कितपत माहिती आहे?

**सुधा :** सगळं कबूल करायला लावलं त्यानं मला.

**श्रीकांत :** आणि तू सारं कबूल केलंस?

**सुधा :** दुसरा काय मार्ग होता आणि एका ठराविक मर्यादेनंतर लपवणं शक्य नव्हतं मला शिवाय गोष्ट या थराला जाईल असं नव्हतं वाटलं मला

**श्रीकांत :** थोडीशी पड खाल्ली असतीस तर....

**सुधा :** थोडीशी पड? विनवण्या केल्या मी त्याच्या. पण त्याच्यावर काडीइतका परिणाम नाही झाला. त्यानं आपला हेका शेवटपर्यंत सोडला नाही. आणि मला घराबाहेर काढलं...

**श्रीकांत :** हे भलतंच होऊन बसलं. तू थेट इकडे आलीस?

**सुधा :** दुसरीकडे कुठे जाणार मी...?

**श्रीकांत :** कुणी नातेवाईक...

**सुधा :** मुंबईत माझ्ञ नात्याचं कुणी नाही तुम्हाला माहित आहे.

**श्रीकांत :** मग एखादी मैत्रीण?

**सुधा :** जिच्याकडे हक्कानं जाता येईल अशी जवळची मैत्रीण पण नाही मला.

**श्रीकांत :** पण...

**सुधा :** रात्रभर रस्त्यावर काढायला हवी होती मी?

**श्रीकांत :** तसं नाही ग...

**सुधा :** मी इथं आलेलं तुम्हाला आवडलं नाही?

**श्रीकांत :** तसं नाही सुधा. इथं आवडण्याचा प्रश्नच नाहीये. या असहाय अवस्थेत तू इथं आलीस यात काही चूक नाही फक्त त्यानं प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होणार आहे म्हणून मी तसं म्हटलं. माझ्यामुळे त्यानी तुला घराबाहेर काढली आणि आसऱ्याला तू पुन्हा माझ्याच घरी आलीस तर प्रश्न बिकट नाही होणार?

**सुधा :** मग मी काय करायला हवं होतं?

**श्रीकांत :** या क्षणी तर आपण काही करू शकत नाही. बघू आपण, मार्ग शोधून काढू. आजची रात्र तर तू इथंच राहशील.

**सुधा :** आणि पुढं....

**श्रीकांत :** पुढं बघूना आपण काय करायचं ते. मी तुला वाऱ्यावर सोडून देणार नाही. विश्वास ठेव माझ्यावर.

**सुधा :** मला खूप भीति वाटतेय.

**श्रीकांत :** घाबरायचं काय कारण?

**सुधा :** तुम्हाला नाही समजायचं ते. एक मात्र निश्चित सांगते. मला पुन्हा घरात नाही घ्यायचे ते.

**श्रीकांत :** तुझी खात्री आहे?

**सुधा :** त्यांना मी चांगलं ओळखते.

**श्रीकांत :** तू इतकी निराश होऊ नकोस. काहीतरी मार्ग निघेल.

**श्रीकांत :** सुनंदाला माहिती आहे?

**श्रीकांत :** कशाविषयी?

**सुधा :** आपल्याविषयी...

**श्रीकांत :** आपली मैत्री आहे हे माहिती आहे तिला.

**सुधा :** इतकंच?

**श्रीकांत :** इतकंच. या पलीकडे नाही. (क्षणभर स्तब्धता) मला वाटतं तू आज इथं राहणार आहेस हे सांगायला हवं सुनंदाला.

**सुधा :** आणि कारण काय सांगणार?

**श्रीकांत :** डोन्ट वरी. मी बघतो काय आणि कसं सांगायचं ते. तू शांत झालीस?

**सुधा :** हं....!

**श्रीकांत :** मग बोलावू तिला? (सुधा मानेनंच हो म्हणते. श्रीकांत बेडरूमच्या दारापाशी जातो) सुनंदा... सुनंदा... जरा बाहेर ये... (सुनंदा बाहेर येते) माफ कर... तुला जरा आत जायला सांगितलं कारण याना कांही खाजगी सांगायचं असेल तर ऑकवर्ड वाटायला नको म्हणून.

**सुनंदा :** मी समजू शकते.

**श्रीकांत :** ह्या...

**सुनंदा :** माझ्या पुढ्यांत यांचा उल्लेख 'तुम्ही' 'ह्या' असा करायची गरज नाही. तुम्ही एरवी त्यांना तू म्हणता हे माहित आहे मला.

**श्रीकांत :** एक प्रॉब्लेम निर्माण झालाय.

**सुनंदा :** काय झालं एवढं?

**श्रीकांत :** हिचं आणि अरूणचं कडाक्याचं मांडण झालं.

**सुनंदा :** बरं मग...

**श्रीकांत :** अरूणनं डोक्यात राख घालून हिला घराबाहेर काढलं. तो अजिबात ऐकायला तयार नाही...

**सुनंदा :** पण असं कारण तरी काय झालं...?

**श्रीकांत :** मी नाही विचारलं.... बरंच गंभीर प्रकरण दिसतंय...

**श्रीकांत :** निदान आजची रात्र तरी ही आपल्याकडे रहाणाराय. (क्षणभर स्तब्धता) तुझी हरकत नाही ना?

**सुनंदा :** तुम्हाला एक सांगू ?

**श्रीकांत :** काय?

**सुनंदा :** तुम्ही जरा काळजी घेतली असती तर आज ही वेळ आली नसती.

**श्रीकांत :** म्हणजे....?

**सुनंदा :** आणखी स्पष्ट सांगायला हवं? हॉटेल सफायरच्या रूम रिझर्वेशनच्या कन्फर्मेशनचा फोन मी घेतला होता.

**श्रीकांत :** काऽय?

**सुनंदा :** तुमच्या या चोरट्या भेटीगाठी मला फार पूर्वीपासून माहिती आहेत....

**श्रीकांत :** पण मग आता... हिच्या बाबतीत....

**सुनंदा :** मी काय करायला हवं असं तुम्हाला वाटतं?

**[दृष्य समाप्त]**

**[अंक समाप्त]**

२३७७०

# अंक दुसरा [दृश्य – १]

— अरूणच्या घराचा दिवाणखाना. चार दिवस उलटले आहेत वेळ संध्याकाळची पडदा उघडतो तेव्हां रंगमंचावर कुणीही नाही. टेलीफोनची बेल वजते. उचलायला कुणी येत नाही. वाजत रहाते. बजाबा आतून येतो. तो टेलीफोनजवळ जाईपर्यंत फोन डिस्कनेक्ट होतो. तो आत जायला वळतो इतक्यात दारावरची बेल वाजते. तो जाऊन दार उघडतो. श्रीकांत प्रवेश करतो. —

**बजाबा :** साहेब घरात नाहीत. पण येतील एवढ्यात. तुम्ही बसाना. (आत जातो. थोड्या वेळानं अरूण प्रवेश करतो.)

**अरूण :** तुम्हाला भेटायची माझी इच्छा नाही हे स्पष्ट सांगून सुद्धा तुम्ही इथं मला भेटायला आलात.

**श्रीकांत :** होऽ...

**अरूण :** तर मग तुम्हाला मी नोकराकरवी धक्के मारुन बाहेर काढलं तर ते चूक ठरणांर नाही.

**श्रीकांत :** तुम्ही निश्चित तसं काही करणार नाही याची खात्री आहे मला.

**अरूण :** (क्षणभर थांबून) येऽस. यू आर करेक्ट. सभ्यतेच्या आणि सौजन्याच्या मर्यादा मी अजून ओलांडल्या नाहीत. मी तरी... तुम्ही आलात पण त्याचा फारसा उपयोग होणार नाही.

**श्रीकांत :** असं तुम्ही धरून का चालतां? कदाचित उपयोग होईलही. मी जर तुम्हाला कांही सांगितलं...

**अरूण :** तर ऐकायला बांधील नाही मी.

**श्रीकांत :** मान्य आहे. पण तरीही मी ऐकवणार आहे. तुम्हाला कान बंद करता येणार नाहीत. एक तुम्हाला तरी आत जावं लागेल किंवा मला बाहेर काढावं लागेल. आणि यातली कोणतीच गोष्ट तुम्ही करणार नाही.

**अरूण :** असंच नाही. पहिली गोष्ट मी निश्चित करणार नाही. पण एका ठराविक मर्यादेनंतर दुसरी गोष्ट निश्चित करीन. यू मे ट्राय. बोला.... काय बोलायचंय?

**श्रीकांत :** आज चार दिवस होऊन गेले सुधा माझ्याकडे रहातेय.

**अरूण :** तुम्हाला पोसायला जड झाली असेल तर जायला सांगा तिला.

**श्रीकांत :** कुठं?

**अरूण :** हे मला विचारायला तुम्ही इथं आलात?

**श्रीकांत :** तुम्ही तिला घराबाहेर काढलंत. तिच्या अपराधाबद्दल फार मोठी शिक्षा दिलेय तुम्ही तिला.

**अरूण :** आणि त्याबद्दल तुम्ही मला जाब विचारायला आलात का रदबदली करायला आलात? माझ्या कृतीच्या बरेवाईटपणाबद्दल तुमच्या सर्टिफिकेटची गरज नाही मला. आणि याचसाठी तुम्ही इथं आला असाल तर याक्षणी इथून जाऊ शकता दॅटस् ऑल.

**श्रीकांत :** मला जे काही सांगायचंय ते अजून सांगून झालं नाही.

**अरूण :** संबंध काय तुमचा?

**श्रीकांत :** संबंध काय? जे काही घडलंय त्याला मीही जबाबदार आहे हे नाकारू शकत नाही मी.

**अरूण :** त्याकरता क्षमा मागायला आलात तुम्ही?

**श्रीकांत :** मी क्षमा मागून संपणाराय सारं?

**अरूण :** हे कधीच संपणार नाहीये. आणि तरीही तुम्ही इथं यायचं धाडस केलंत. कशासाठी?

**श्रीकांत :** सुधासाठी. तिनं चारवेळा प्रयत्न केला तुम्ही तिच्याशी फोनवरही बोलायला तयार नाही. शी इज मिझरेबल. असहाय्य अवस्था झाली आहे तिची. तिच्याशी तुम्ही निदान बोलायला तयार व्हा. मी या क्षणी इथून निघून जायला तयार आहे.

**अरूण :** तिच्या या अवस्थेला मी जबाबदार नाही. तर तुम्ही जबाबदार आहात तिच्याइतकेच. आणि काय गंमत आहे एक आरोपी दुसऱ्या आरोपीचं वकीलपत्र घेऊन माझ्याकडे येतोय.

**श्रीकांत :** स्वतःला न्यायाधीश समजताय तुम्ही?

**अरूण :** होऽ.... न्यायाधीश समजतोय मी स्वतःला. अरे तुम्हाला काय होतंय तिची वकीली करायला? माझा काही अपराध नसताना एक जीवघेणी शिक्षा भोगायला लावली आहे तिनं मला. खरं म्हणजे तुम्हालाही इतकं कां बोलू दिलं हे माझं मला समजत नाहीये. या क्षणी तुम्हाला घरात प्रवेशसुद्धा द्यायला नको होता. मी तुमचं असं काय घोडं मारलं होतं की माझा बावीस वर्षांचा संसार तुम्ही उधळून लावलात. माझ्या बायकोला माझ्यापासून हिरावून घेतलीत. या घरानं तुमच्यावर टाकलेल्या विश्वासाला तुम्ही सुरुंग लावलात. तुमच्या मैत्रीत पाप असेल असं मला चुकुनही वाटलं नाही. पण ती मैत्री नव्हतीच. मैत्रीच

नाटक होतं. वासनेला चढवलेला निव्वळ एक मुखवटा होता. आय हेट हर.... आय हेट यू टू.... तुम्ही जा इथून. मला या विषयावर आणखी बोलायचं नाहीये.

**श्रीकांत :** जातोय मी. जे सांगण्यासाठी आलो होतो ते न सांगताच जातोय. काहीही ऐकून घ्यायच्या मनस्थितीत तुम्ही नाही आहात. इथं यायचं धाडस केलं ते तुमच्याकडून सारं ऐकायची तयारी ठेवूनच. जस्टीफिकेशन देण्यासाठी नाही.... कारण ती क्षमा मागण्यासाठी नाही, कारण मी मागणं आणि तुम्ही ती करणं दोनही मूर्खपणाचं आहे. तरीही आलो. अजूनही मला वाटतं सुधाला इतकी कठोर शिक्षा करू नका, तिला घरात घ्या. मी नंतर आयुष्यात तिला पुन्हा कधी भेटणारही नाही....

**अरूण :** तुमच्या ऑफरबद्दल धन्यवाद. पण ते शक्य नाही....

**श्रीकांत :** का शक्य नाही?

**अरूण :** तुम्ही तिच्या आयुष्यातून निघून गेल्यानं मी बदलणाराय? मी रूक्ष आहे, निष्प्रेम आहे तो रसिक होणार आहे? ती दुसरा पुरूष शोधणार नाही याची खात्री द्याल तुम्ही....?

**श्रीकांत :** पण....

**अरूण :** आमच्या फॅक्टरीत एखादी डाय बिघडली की मी ती स्क्रॅपमध्ये टाकतो.

**श्रीकांत :** बायकोची तुलना तुम्ही डायबरोबर करता?

**अरूण :** येऽस...! व्हेन द फिलींग्ज डाय अ ह्युमनबिईंग इज नथिंग बट अ यूसलेस डाय... स्क्रॅप इट....

**श्रीकांत :** तुम्हाला तिच्याबद्दल काहीच वाटत नाही? तिचं आयुष्य बरबाद व्हाव असं तुम्हाला वाटतं?

**अरूण :** मुळीच नाही. पण म्हणून तिच आयुष्य सुखी होण्याकरता माझं घर मी तिला देणार नाही. ती सुखी व्हावी असं मला मनापासून वाटतं... म्हणून मी एक ऑफर देतो तुम्हाला.... तुम्ही तिच्याशी लग्न करायला तयार असाल तर बाय म्युच्युअल कन्सेन्ट घटस्फोट द्यायला मी तयार आहे.

**श्रीकांत :** पण माझं लग्न झालंय....

**अरूण :** सो व्हॉट? घटस्फोट द्या तुमच्या बायकोला... थिंक इट ओव्हर बाय द वे, आता पुन्हा कधीही मला भेटण्याचा प्रयत्न करू नका. शेवटी मीही एक माणूसच आहे... सौजन्याच्या सभ्यतेच्या मर्यादा पाळणं मला नेहमीच जमेल असं नाही. (श्रीकांत जायला निघतो. इतक्यात दारांत कॉलेजातून परतलेली प्राजक्ता.)

**प्राजक्ता :** (थंडपणानं) हॅलोऽ...

**श्रीकांत :** हॅलोऽ...

**प्राजक्ता :** ममा कशी आहे?

**श्रीकांत :** ठीक आहे.

**प्राजक्ता :** बजाबाबरोबर पाठवलेले तिचे कपडे मिळाले? (श्रीकांत मानेनं हो म्हणतो.) तिला सांगा आणखी कांही हंव असेल तर फोन कर मी पाठवून देईन.

**अरूण :** परस्पर केलंस तू हे सारं? मला न विचारता?

**प्राजक्ता :** तुम्हाला विचारायची मला गरज नाही भासली. नको म्हणण्या इतके क्षुद्र तुम्ही नाही हे धरून चालले मी. माझं चुकलं? (अरूण गप्प)

**श्रीकांत :** माझ्यावर राग असेल तुझा प्राजक्ता.

**प्राजक्ता :** नाही अंकल... तुमच्यावरचा लोभ नाहीसा झालाय पण राग नाहीये तुमच्यावर....! कुणावरच नाही....

**श्रीकांत :** कां?

**प्राजक्ता :** तुमच्यावर काय रागवायचं? सारीजण सुखाची खरेदी विक्री करणारे व्यापारी आहात. फक्त स्वतःचा, स्वतःच्या फायद्याचा हिशेब करणारे व्यापारी पण मी तुमच्याहून फार वेगळी आहे. पपानी ममाला घराबाहेर काढल्यावर माझ्या मनांत माझं कसं होईल हा विचार नाही आला. विचार आला, "ममा आता कुठं जाईल? काय करील ती?" सांगा ना तुमच्यावर काय रागवायचं?

**श्रीकांत :** (क्षणभर स्तब्धता) ममाला आणखी काही सांगायचंय?

**प्राजक्ता :** सध्या तरी नाही. सांगण्यासारखं काही असलं तर मी स्वतः येऊन भेटेन तिला.

**श्रीकांत :** मी निघतो. (जातो. क्षणभर स्तब्धता थोडया वेळानं प्राजक्ता आपली पुस्तकं घेऊन आत जायला निघते.)

**अरूण :** थांब प्राजक्ता (प्राजक्ता थांबते.) श्रीकांत इथे कां आला होते हे तू नाही विचारलंस

**प्राजक्ता :** उत्तरं माहित असलेले प्रश्न काय विचारायचे?

**अरूण :** म्हणजे....

**प्राजक्ता :** श्रीकांत अंकल इथे आले होते ममाला परत घरात घ्या म्हणून सांगायला. आणि तुम्ही त्यांना स्पष्ट नकार दिलात. सांगितलत 'हे शक्य नाही' बरोबर ना? (अरूण गप्प.) पपा, मी मघाशीच सांगितलं. तुम्ही सारीजणं सुखाची खरेदी-विक्री करणारे व्यापारी आहात. ममानं श्रीकांत अंकलना पाठवल कारण तिला चिंता आहे तिच्या भवितव्याची, श्रीकांत अंकल इथं आले

कारण त्यांना चिंता आहे त्यांचा परीटघडीचा संसार विसकटेल याची.

**अरूण :** आणि मी?

**प्राजक्ता :** रागावू नका पपा पण् तुमचं फ्रस्ट्रेशनं आहे ते चढ्या भावात घेतलेलं, वरून सुंदर दिसणार रॉ मटीरिअल, आतून सडकं किडकं निघाल्यावर, कारखानदाराला येणारं फ्रस्ट्रेशन.

**अरूण :** मला नाही वाटत माझं काही चुकलंय.

**प्राजक्ता :** तुम्हालाच काय... आपलं कांही चुकलंय हे कुणालाच वाटत नाहीये. तुम्ही प्रत्येकानी स्वत:विषयीचं जजमेंट स्वत:च दिलय. 'माझं कांही चुकलं नाहीये' पण पपा मला एकच सांगा... प्राजक्ता नांवाच्या कोवळया मनाचं कुठं, काय आणि कसं चुकलंय ज्याकरता तिला मनस्ताप सहन करायला लागावा.

**अरूण :** तू दोष मलाच देतेस...

**प्राजक्ता :** मी दोष कुणालाच देत नाहीये. माझा काही दोष नाही इतकंच मला सांगायचंय.

**अरूण :** तुझ्या ममाचं समर्थन करायचंय तुला? तुझी ममा व्यभिचारी आहे हे सत्य नाकारणारायस तूं?

**प्राजक्ता :** सत्य नाकारता येत नाहीत. ती स्वीकारणं भाग असतं. मी स्वीकारलय ते.

**अरूण :** हे बघ, प्राजक्ता तुला काळजी करायचं कारण नाही. मी तुला वाऱ्यावर सोडणार नाही की तुझ्याकडे दुर्लक्षही करणार नाही. तुला मी काही म्हटल्या काही कमी पडूं देणार नाही.

**प्राजक्ता :** फक्त तू तुझ्या ममाला विसरून जा.

**अरूण :** हा निर्णय घेताना मला आनंद झाला असं वाटतंय तुला?

**प्राजक्ता :** तुमचा अहंकार निश्चित सुखावला पपा.

**अरूण :** मग मी काय करायला हवं होतं....?

**प्राजक्ता :** मला समजत नाही प्रत्येकजण हा प्रश्न सारं काही होऊन गेल्यावर कां विचारतो. पपा, ममानं जसं वागायला नको होतं तसं ती वागली, हे जितकं खरं आहे, तितकचं तुम्ही तिला घराबाहेर काढलं हेही खरं आहे. तुमच्या दृष्टीनं तुम्ही या प्रश्नाचा कायमचा निकाल लावलाय. माझ्या दृष्टीनं प्रश्नांच्या मालिकेला आता सुरूवात झालेय. ममा चुकली, तुम्ही शिक्षा केलीत. इथं संपतं सारं? शाळेत असताना मी कविता पाठ केली नाही म्हणून टीचरनी मला शिक्षा केली होती. माझ्या कोवळ्या हातावर सपासप छड्या मारल्या. माझ्या हातावर वळ उठले पण म्हणून पाठ न केलेली कविता पाठ नाही

झाली. ती तशीच पाठ न झालेलीच राहिली. शिक्षा हे प्रत्येक प्रश्नाचं उत्तर होऊ शकतं नाही पपा.

**अरूण :** तुझ्या मनात काय आहे ते मला समजत नाही.

**प्राजक्ता :** माझ्या मनात काय चाललंय ते माझं मलाही समजत नाहीये. कारण दुसऱ्यांच्या मनांचा विचार करण्याची वाईट सवय आहे मला. जाऊ दे पपा. हा विषय इथंच संपवूया.... (जायला लागते.)

**अरूण :** एक मिनीट आशुतोषचे आईवडील..... काल सांगितलंस.... केव्हा येणार आहेत?

**प्राजक्ता :** इतक्यात नको म्हणून सांगितलंय. आणखी चार दिवस वाट पहाणार आहे मी. ही परिस्थिती अशीच राहिली तर आपल्या घरात काय घडलंय हे सारं खरं खरं सांगून टाकणार आहे मी त्यांना काहीही न लपवता. तरीही यायचं का नाही हा निर्णय मग त्यांनी घ्यायचाय.

**अरूण :** प्राजक्ता...

**प्राजक्ता :** मी वाट पहाणाराय फक्त चार दिवस....

**[अंधार..... दृश्य समाप्त]**

# अंक दुसरा [दृश्य – २]

— आणखी तीन दिवस उलटून गेले आहेत. श्रीकांतच्या घराचा दिवाणखाना वेळ संध्याकाळची. प्रकाश येतो तेव्हा रंगमंचावर फक्त सुधा. पुस्तक वाचण्यांत स्वत:च मन गुंतवण्याचा अयशस्वी प्रयत्न. आतून सुनंदा येते.—

**सुनंदा :** चहा घेणार आहात परत?

**सुधा :** नको खरंच नको...

**सुनंदा :** तुम्हाला चहा अतिशंय आवडतो हे महित आहे मला.

**सुधा :** तुम्ही माझ्याशी इतक्या चांगल्या का वागता?

**सुनंदा :** म्हणजे?

**सुधा :** मला फार ऑकवर्ड वाटतं. मनाला त्रास होतो...

**सुनंदा :** तुम्हाला त्रास व्हावा म्हणून मुद्दाम मी तसं वागत नाही. वाईट वागणं माझ्या स्वभावात नाहीये. ठरवूनही मला वाईट वागता येत नाही.

**सुधा :** तुमच्या चांगुलपणानं मला अनकम्फर्टेबल व्हायला होतं.... का तुम्ही माझ्याशी इतक्या चांगल्या वागता?

**सुनंदा :** मी कसं वागायला हवं असं तुम्हांला वाटतं?

**सुधा :** तुम्हाला माझ्याविषयी तिरस्कार वाटायला हवा...

**सुनंदा :** तो वाटत नाही असं तुम्हाला वाटतं?

**सुधा :** म्हणजे...? तुम्ही माझा तिरस्कार करता? पण तुमच्या वागण्यात तो कधीच दिसला नाही.

**सुनंदा :** वागण्यात बऱ्याच गोष्टी दिसत नाहीत. कारण आपण त्या दाखवीत नाही. पण म्हणून त्या नसतातच असं नाही. तुमच्या वागण्यावरून कधी कुणाला वाटलं असतं, तुम्ही तुमच्या नवऱ्याचा तिरस्कार करता?

**सुधा :** कुणी सांगितलं मी त्यांचा तिरस्कार करते. अहो आमचे स्वभाव फार भिन्न आहेत.

**सुनंदा :** जाऊ दे... तुमच्या खाजगी गोष्टींशी मला काही कर्तव्य नाही. एक मात्र सांगते तुमच्याविषयी तिरस्कार नाही वाटत मला. मला तुमची कीव येते.

**सुधा :** मला तुम्हाला एक विचारायचंय. विचारू?

**सुनंदा :** काय?

सुधा : तुम्ही त्या दिवशी म्हणालात. आमचं प्रेम पूर्वीपासूनच माहित होतं...

सुनंदा : प्रेम हा शब्द मी वापरला नव्हता आपण त्याला खेळ म्हणूया.

सुधा : तुम्ही कसं चालू दिलत सारं? कधीही दिसूही दिलं नाहीत.

सुनंदा : मग मी काय करायला हवं होतं? अकांडतांडव करून जगाला तमाशा करून दाखवायला हवा होता? का घटस्फोटाची धमकी देऊन त्यांना वठणीवर आणायला हवं होतं? कां एखाद्या आदर्श भारतीय स्त्रीप्रमाणे रडून भेकून पदर पसरून 'असं करू नका हो' अशी मी त्यांना मनधरणी करायला हवी होती. त्यानं काय साधलं असतं? सांगा काय मिळालं असतं? हे बदलले नसते आणि घराचं घरपण मात्र नाहीसं झालं असतं. कायमचं जे हवं ते साधणार नसतं आणि नको ते निश्चित पदरी पडणार असतं तेव्हा माणसानं स्वस्थ बसावं हे उत्तम.

सुधा : तुम्हाला कळलं तेव्हां शॉक नाही बसला?

सुनंदा : नाही बसला. कधीतरी हे घडणार... तुम्ही नाही तर आणखी कोणी.... हे अपेक्षित होतं मला.

सुधा : म्हणजे...?

सुनंदा : पुरुषाला रात्री शय्येवर स्त्री हवी असते म्हणून नाईलाजानं तो दिवसभर बायको नावाच्या एका स्त्रीला सांभाळतो, तिची काळजी घेतो. पण मी... स्त्री म्हणून निरूपयोगी होत चाललेय. कोरडी होत चाललेय त्यांना हवा तसा प्रतिसाद मी देऊ शकत नाही. हे त्यांच्या लक्षात आलं आणि त्यांचा माझ्यातला इंटरेस्ट कमी होत चालला. मला ते जाणवलं... पण माझा नाईलाज होता. आणि मग मला तुमच्याविषयी कळलं...

सुधा : कसं?

सुनंदा : अशा गोष्टी लपून नाही रहात.

सुधा : तरीही तुम्ही स्वस्थ बसलात?

सुनंदा : होऽ! उलट सुटकेचा निःश्वास टाकला. माझ्या नवऱ्याची भूक मला माहित आहे. भुकेला पुरूष आणि श्वापद यांच्यात काही फरक नाही. दोघही भक्ष्य शोधीत फिरत असतात. भूक भागवल्याशिवाय ती स्वस्थ बसत नाहीत. भुकेल्या माणसाला काही चालतं. मी मनाशी म्हटलं मी देऊ शकत नाही या अतृप्तीत ते एखाद्या बदचाल घाणेरड्या बाईकडे तर गेले नाहीत ना? बस्स. मी तिकडे दुर्लक्ष करायचं ठरवलं.

सुधा : पण तुम्ही तुम्हाला माहित आहे हे लपवून का ठेवलंत?

सुनंदा : पाप करणाऱ्या माणसाच्या मनात सतत अपराधी भावना असते ती अपराधी

भावना त्याला पापाची दुसऱ्या तऱ्हेनं भरपाई करायला लावते. तुम्ही त्यांच्या जीवनात आलात त्याचा परिणाम ते माझ्याशी जास्त चांगलं वागायला लागले. मला जास्तीत जास्त सुख द्यायचा प्रयत्न करायला लागले. तुम्ही दोघं भेटलात की मला समजत असे. त्यांच्या वागणुकीवरून, मला मिळणाऱ्या एक्स्ट्रा-स्पेशल ट्रिटमेंट मधून.

**सुधा :** पण तुम्ही सांगितलं असतं तर.

**सुनंदा :** पाप उघड पडलं असतं. लपवण्यासारखं काही नाही म्हटल्यावर अपराधी भावना गेली असती. तुम्हाला त्यानी सोडल नसतं आणि माझ्या वाटेला उपेक्षा आली असती याहून वेगळं कांही घडलं नसतं...

**सुधा :** कशावरून?

**सुनंदा :** मी तुम्हाला त्या रात्रीपुरता आसरा देण्यापुरती कबूल झाले होते. अर्थात आपणहून त्यानंतर तुम्हाला इथं ठेवून घेताना त्यांना माझ्या परवानगीची गरज नाही भासली.

**सुधा :** तुम्ही दिली नसती?

**सुनंदा :** प्रश्न तो नाही. ती गृहीत धरली गेली हा आहे.

**सुधा :** मी इथं कायमची रहाणार नाहीये.

**सुनंदा :** ते माहित आहे मला...

**सुधा :** माझ्या इथं रहाण्यानं तुम्हाला मनस्ताप होत असेल याचीही जाणीव आहे मला.

**सुनंदा :** मनस्ताप करून घेणाऱ्यांच्या जातीतली मी नाही.

**सुधा :** म्हणजे...

**सुनंदा :** मी तुमच्यासारखी स्वप्नाळू नाही.

**सुधा :** मी स्वप्नाळू आहे?

**सुनंदा :** तुम्ही ज्याच्या पाठीमागे धावताय ते स्वप्न नाही तर काय आहे? मी एक प्रॅक्टीकल बाई आहे. ज्यागोष्टी टाळता येत नाहीत त्या मी स्वीकारते.

**सुधा :** आणि म्हणून तुम्ही मला स्वीकारलंत. तुम्हाला हे रिस्क नाही वाटत?

**सुनंदा :** नाही वाटत.

**सुधा :** आणि उद्या तुम्हाला घटस्फोट देऊन त्यांना माझ्याशी लग्न करायचं असलं तर?

**सुनंदा :** तर....?

**सुधा :** तर काय कराल तुम्ही?

**सुनंदा :** तुमच्याशी लग्न करण्याकरतां त्यांना माझ्यापासून घटस्फोट हवा असेल तर मी का द्यावा...

**सुधा :** एक्झॅक्टली....

**सुनंदा :** असं तुम्हाला वाटत असेल.. पण ते चूक आहे. त्यांना हवा असेल तर कसलीही खळखळ न करता घटस्फोट द्यायला मी तयार आहे. —(सुधा चकित दारावरची बेल वाजते सुनंदा जाऊन दार उघडते. दारात प्राजक्ता —)

**प्राजक्ता :** ममा आहे...

**सुनंदा :** आहे ना... ये... आत ये. (ती आत येते.)

**सुधा :** प्राजक्ता..... (क्षणभर स्तब्धता. सुनंदा आत जाते.)

**प्राजक्ता :** कशी आहेस तू ममा?

**सुधा :** ठीक आहे.... (स्तब्धता) पपा कसे आहेत?

**प्राजक्ता :** बरे आहेत

**सुधा :** आणि तू....?

**प्राजक्ता :** माझं काय?

**सुधा :** अशी अचानक आलीस?

**प्राजक्ता :** तुला भेटावसं वाटलं.

**सुधा :** ह्यांनी तुला परवानगी दिली?

**प्राजक्ता :** मी विचारलीच नाही. आईला भेटायला परवानगी कसली?

**सुधा :** माझा तिरस्कार करीत असशील तू.

**प्राजक्ता :** लॉजिकली मी तुझा तिरस्कार करायला हवा. पण कां कोण जाणे मला तुझा तिरस्कार नाही वाटत. कदाचित्, कशीही असलीस तरी तू माझी जन्मदाती आई आहेस हे नाही मी विसरू शकत, म्हणुन असेल पण मला तुझा तिरस्कार नाही वाटत.

**सुधा :** पण पपाना वाटतो.

**प्राजक्ता :** साहजिक आहे. नवराबायकोचं नातंच मुळात अपेक्षांवर आधारित असतं. अपेक्षाभंगाबरोबर ती नातीही भंगतात. बोलून चालून दोन माणसांना एकत्र बांधून लादलेलं नातं ते. तुझं माझं तसं नाही. आय ॲम पार्ट ऑफ यू.

**सुधा :** कुठून शिकलीस हे...?

**प्राजक्ता :** तुला आवडत नाहीत त्या पुस्तकांनी, मला शिकवलं हे. ममा, मला तुझ्याविषयी काय वाटतं, पपाना काय वाटतं, जगाला काय वाटतं याला महत्त्व नाही. तुला आज स्वतःविषयी काय वाटतं?

**सुधा :** तेच जाणून घेण्यासाठी झगडतेय मी गेले काही दिवस. पण तू माझा तिरस्कार

करीत नाहीस हे ऐकून खूप बरं वाटलं प्राजक्ता.

**प्राजक्ता :** ममा माणसाच्या प्रत्येक चुकीबद्दल तिरस्कार करायचा म्हटला तर जगात तिरस्काराशिवाय दुसरी भावनाच उरणार नाही.

**सुधा :** माझं चुकलं असं वाटतं तुला?

**प्राजक्ता :** चुकलं नाही असं वाटतं तुला? तुझ्या अपेक्षा कदाचित् चुकीच्या नसतील पण मार्ग बरोबर असतील असं नाही

**सुधा :** किती सावध बोलतेस तू.

**प्राजक्ता :** कुणाविषयी धाडकन् जजमेंट देणं मला आवडत नाही. जाऊ दे ममा... त्याच्याविषयी उगाच चर्चा कशाला? माझ्या हातात काहीच नाही. पुढचं पाऊल काय टाकायचं ते पपा ठरवतील.... तुझ्याकडून तू ठरवशील. माझ्या हाती फक्त ते पहात रहाणं. खरं म्हणजे तुला सांगायचं नव्हतं मला. पण ममा तू ज्या मार्गावर गेलीस त्या मार्गावर जाताना किंवा तू तशी गेलीस म्हणून तुला शिक्षा करताना, तुझ्या किंवा पपांच्या मनात क्षणभर जरी लाडक्या लेकीचा विचार आला असता तर हे घडलंच नसतं. जाऊ दे ममा...

**सुधा :** तुझा आशुतोष आवडला मला.

**प्राजक्ता :** हे तू न सांगता मी त्याला सांगितलं.

**सुधा :** त्याचे आईवडील येणार होते ना आपल्याकडे.

**प्राजक्ता :** ते मी लांबणीवर टाकायचं बघतेय... बघूया... बरं ममा थोडेसे पैसे आणले आहेत तुझ्याकरतां. तुला लागले तर कुणापुढे हात पसरायला नको.... (पैसे देते.)

**सुधा :** कुठून आणलेस?

**प्राजक्ता :** माझ्या अकाऊंटमधले आहेत.

**सुधा :** मला फार त्रास होतोय. मला पुन्हा घरी यायचंय.

**प्राजक्ता :** ते इतक्यात शक्य होईल असं वाटत नाही ममा. पपा फार हट्टाला पेटले आहेत. श्रीकांत अंकल घरी आले होते तेव्हा पपानी उलटी ऑफर दिली त्यांना. पपानीच सांगितलं मला.

**सुधा :** कसली ऑफर?

**प्राजक्ता :** तुला सांगितलं नाही श्रीकांत अंकलनी?

**सुधा :** नाही.....

**प्राजक्ता :** श्रीकांत अंकल तुझ्याशी लग्न करणार असतील तर पपा तुला घटस्फोट

घायला तयार आहेत....

सुधा : प्राजक्ता.....

[अंधार..... दृश्य समाप्त]


सं. ठाणे, वाचनालय शाखा.

क्र. 23550 नों. दि. 28/5/80

वि. नाटक क्र. ..................

# अंक दुसरा [दृश्य – ३]

— श्रीकांतच्या घराचा दिवाणखाना वेळ संध्याकाळची.
रंगमंचावर फक्त श्रीकांत आणि सुधा —

**सुधा :** आज आठवडा होत आला. किती दिवस मी इथं तुमच्याकडे असं रहायचं?

**श्रीकांत :** मीही त्याचाच विचार करतोय. इट इज ऑक्वर्ड. बाहेर कुजबुज वाढत चाललेय.

**सुधा :** म्हणजे....?

**श्रीकांत :** अशा गोष्टी पसरायला वेळ लागत नाही. शिवाय सुनंदाही अपसेट झाल्यासारखी वाटतेय.

**सुधा :** तसं म्हणाल्या त्या तुमच्याकडे?

**श्रीकांत :** नाही. पण माझा तर्क आहे.

**सुधा :** मी अरूणला विनंती केली तर?

**श्रीकांत :** त्याचा काही उपयोग होणार नाही. तुला पुन्हा घरात घ्यायचं नाही या त्याच्या निश्चयापासून तो जराही ढळणार नाही. मी अक्षरशः विनवणी केली त्याची. त्यानं केलेला अपमानही गिळला. पण तरीही त्यानं आपला निर्णय बदलला नाही.

**सुधा :** माझ्या सांगण्यानं कदाचित् फरक पडेल.

**श्रीकांत :** तुझ्याशी फोनवर सुद्धा बोलायची ज्याची इच्छा नाही तो तुला पुन्हा घरात घेईल?

**सुधा :** पण मग मी किती दिवस इथे रहायचं? माझा जीव गुदमरतोय.

**श्रीकांत :** मला कळतंय ते. तुझी काहीतरी व्यवस्था करायला हवी. त्याच खटपटीत आहे मी.

**सुधा :** व्यवस्था करायला हवी म्हणजे?

**श्रीकांत :** बाहेर कुठंतरी. तू असं का नाही करीत? काही दिवस एखाद्या हॉटेलमध्ये....

**सुधा :** एकटीनं राहू मी? किती दिवस पुढे काय?

**श्रीकांत :** अग हे तात्पुरतं...

**सुधा :** नको.... मला नाही आवडणार.

**श्रीकांत :** तुला आईवडील नाहीत माहीत आहे मला. पण काका काकू तर आहेत ना पुण्याला? त्यांच्याकडे काही दिवस.....

सुधा : एका वाडयातल्या दोन खोल्यात संसार आहे त्यांचा. ती दोघ आणि चार मुलं. त्यांच्याकडे कुठे जाऊ मी....?

श्रीकांत : मग एखाद्या लेडीज हॉस्टेलवर सोय होते कां बघतो मी. हे बघ शक्य ती सारी मदत मी तुला करीन....

सुधा : शक्य ती. हं... आणि शक्य नसेल तर वाऱ्यावर सोडून देणार मला?

श्रीकांत : उगाच भलत्या गोष्टी गृहीत धरू नकोस तू.

सुधा : तुमच्या एक गोष्ट लक्षांत आलेय?

श्रीकांत : कोणती?

सुधा : तुम्ही फक्त माझी रहायची व्यवस्था कुठं करायची इतकाच विचार करताय.

श्रीकांत : म्हणजे....?

सुधा : माझा संसार विसकटून गेलाय हे तुमच्या गावीही नाही. मला रहायला घर नाही.. इतकंच नाही तर मला माझी माणसंही नाहीत साऱ्यापासून तुटून एकटी पडलेय मी. या क्षणी तरी मी उध्वस्त झालेय. मनानं खचून गेलेय. मला फक्त चार भिंती आणि छप्पर यांचा आसरा नकोय... मला प्रेमाचा आधार हवाय.....

श्रीकांत : मी तुला दूर लोटलेली नाही. माझ्यावर विश्वास नाही तुझा?

सुधा : त्या आधारावरच अजून तग धरून आहे मी. तुमचं खरंच प्रेम आहे माझ्यावर?

श्रीकांत : अगदी खरं...

सुधा : मग मला कायमचा आधार द्याल?

श्रीकांत : कायमचा आधार म्हणजे?

सुधा : माझ्याशी लग्न कराल?

श्रीकांत : डोन्ट बी सिली?

सुधा : आय ॲम नॉट सिली. मी गंमत म्हणून विचारीत नाहीये. सिरीअसली विचारतेय.

श्रीकांत : माझं लग्न झालय हे तू विसरतेस.

सुधा : मुळीच नाही. उलट तुम्हीच घटस्फोट घेतां येतो हे माहीत नसल्याचं दाखवताय?

श्रीकांत : तुला काय सुचवायचंय...? सुनंदाला घटस्फोट देऊ मी?

सुधा : त्याशिवाय तुम्हाला माझ्याशी लग्न करता येईल?

श्रीकांत : अग पण सुनंदाचा काय दोष?

सुधा : तुमच्या मोहात पडले हा माझा दोष? दोषांची चर्चा मला करायची नाहीये. मला माझ्या विस्कटलेल्या आयुष्याची पुन्हा घडी घालायची आहे. ॲट ॲनी कॉस्ट. माझ्यावर जे काही ओढवलंय त्याला माझ्याइतकेच तुम्हीही जबाबदार आहात.

मी त्याची किंमत मोजलेय तुम्हीही आता त्याची किंमत मोजा. मला माझं सुख पुन्हा हवंय. तुम्ही त्यासाठी सुनंदाला घटस्फोट देऊन माझ्याशी लग्न करायलाच हवं....

**श्रीकांत :** हे बघ तू जरा शांतपणे विचार कर....

**सुधा :** आणि...?'

**श्रीकांत :** घटस्फोट घेणं इतकं सोप नाहीये

**सुधा :** का नाही...? परस्पर संमतीनं.....

**श्रीकांत :** सुनंदा कधीही कबूल होणार नाही.

**सुधा :** पण त्यांना आपलं रिलेशन माहित आहे.

**श्रीकांत :** तरीही ती कबूल होणार नाही. ते केवळ अशक्य आहे.... ती मला सहजासहजी,सोडणार नाही.

**सुधा :** खरंच तुम्हाला असं वाटतं....?

**श्रीकांत :** अगदी शंभर टक्के!

**सुधा :** मग प्रश्नच मिटला.....

**श्रीकांत :** तिच्याही औदार्याला मर्यादा आहेत.

**सुधा :** तेही खरंच.

**श्रीकांत :** तुला माहित आहे माझं तुझ्यावर किती प्रेम आहे. सुनंदा घटस्फोट द्यायला तयार असेल तर मी तुझ्याशी निश्चित लग्न करीन विश्वास ठेव माझ्यावर.

**सुधा :** माझी खात्री आहे. म्हणूनच मी आधी सुनंदाला विचारलं. त्या घटस्फोट द्यायला तयार आहेत.

**श्रीकांत :** नाही नाही.... ते शक्य नाही.

**सुधा :** मी स्वत: विचारलंय त्यांना. त्यांना इथं बोलावून समोरासमोर रुजुवात घालून देऊ? सांगा.... (तो गप्प) आता तर काही अडचण नाही ना?

**श्रीकांत :** पण ती तयार कशी झाली?

**सुधा :** त्यांच्याही औदार्याला मर्यादा आहेत. गोष्टी या थराला जातील याची त्याना कल्पना नव्हती. पण अखेर नाइलाजानं त्या तयार झाल्या.

**श्रीकांत :** पण अरूण तुला घटस्फोट घायला तयार होणार नाही....

**सुधा :** तुम्ही माझ्याशी लग्न करायला तयार असाल तर ते लगेच घटस्फोट द्यायला ते तयार आहेत. ही त्यांचीच ऑफर तुम्ही माझ्यापासून लपवून ठेवलेली मला माहिती आहे ती.

**श्रीकांत :** तुला कुणी सांगितलं हे?

सुधा : प्राजक्तानं ! अरूण मला घटस्फोट द्यायला तयार आहेत सुनंदा तुम्हाला घटस्फोट द्यायला तयार आहे. आता तर काही अडचण नाही ना.... ? (तो गप्प) बोला ना. तुम्ही गप्प कां? माझ्याशी लग्न तुम्ही करणार कां याचं खरंखुरं उत्तर हवंय मला.

श्रीकांत : मला नाही वाटत मला शक्य होईल ते.

सुधा : का नाही शक्य?

श्रीकांत : सुनंदाला आणखी दुखवायचं नाही मला

सुधा : त्या दुखावण्याच्या पलीकडे गेल्या आहेत.

श्रीकांत : मला माझा संसार मोडायचा नाही.

सुधा : माझा संसार मोडला त्याचं काय?

श्रीकांत : त्याला मी काय करू?

सुधा : असं बोलायला तुमच्या जीवाला काही वाटत नाही?

श्रीकांत : तुझा संसार मोडला म्हणून माझा संसार मी मोडायलाच हवा कां?

सुधा : मग 'सुनंदा' घटस्फोट द्यायला तयार असेल तर मी तुझ्याशी लग्न करीन' असं कोणत्या तोंडानं सांगितलंत? तुम्ही खोटे आहात. मला फसवलंत तुम्ही.

श्रीकांत : मी तुला फसवलेलं नाही. मी विवाहित आहे हे माहित असून तू उघडया डोळयानीं माझ्याकडे आलीस. मी तुला कधीही खोटी वचनं, खोटी आश्वासनं दिली नाहीत. हे असं होईल याच काय स्वप्न पडलं होतं कुणाला? गोष्टी या थराला जातील हे माहित होतं कुणाला? दुर्दैवानं तसं झालं.... तुझा संसार उधळला म्हणून माझा संसार उधळण्याचा हट्ट तू का करतेस? सुनंदाला घटस्फोट देऊन तुझ्याशी लग्न करणं मला शक्य नाही. कधीच नाही. माझा संसार मी मोडणार नाही.... माझं आयुष्य मी नासून टाकणार नाही. माझ्या मुलाच्या आयुष्यावर मी त्याची छाया पडू देणार नाही. माझी सामाजिक प्रतिष्ठा....

सुधा : खड्डयात गेली तुमची सामाजिक प्रतिष्ठा. एका विवाहित स्त्रीबरोबर रोमान्स करताना कुठं गेली होती तुमची सामाजिक प्रतिष्ठा? तुम्ही ढोंगी आहांत.... स्वार्थी आहांत. तुमचं प्रेम वगैरे सगळं खोटं आहे.... नुसते शब्दांचे बुडबुडे. तुमची रसिकता हा एक मुखवटा आहे.... इष्काचे रंग उधळायला तुम्हाला एक देखणी स्त्री हवी होती. रोमान्सचं थ्रिल हवं होतं.... तुम्ही ते सारं उपभोगलंत.... फसवे शब्द वापरून तुम्ही मला वापरलंत. आणि आतां मी गळयात पडतेय हे लक्षात आल्यावर तुम्हाला तुमची सामाजिक प्रतिष्ठा आठवली, बायकोवरची निष्ठा आठवली, मुलांविषयीचं कर्तव्य आठवलं. घाबरू

नका. मी तुमच्या गळयात पडणार नाही.... सुनंदा घटस्फोट द्यायला तयार आहे हे मी तुम्हाला खोटंच सांगितलं. मी तिला विचारलेलं नाही. माझा संसार उधळला म्हणून दुसऱ्याचा संसार उधळण्याइतकी मी हलकट नाही. पण तुमचं खरं रूप मात्र मला आज समजलं.... कृपा करून तुम्ही इथून जा मला एकटीला राहू दे.... मला एकटीला राहू दे....

(तो निमूटपणान आत जातो. ती एकटीच. थोडया वेळानं सुनंदा येते बाहेरून. सुधाचा चेहरा आणि डोळे पाहून काहीतरी घडूनं गेलंय हे तिच्या लक्षात येतं)

**सुनंदा :** काय झालं?

**सुधा :** काही नाही.... कां?

**सुनंदा :** असा काय दिसतोय तुमचा चेहरा? तुम्हाला बरं नाही का वाटत?

**सुधा :** बरी आहे की मी

**सुनंदा :** मग काय झालं ते मला सांगा.

**सुधा :** तुमच्या नवऱ्याला मी तुमच्यापासून घटस्फोट घ्यायला सांगितलं.

**सुनंदा :** आणि....?

**सुधा :** आणि माझ्याशी लग्न करायचा आग्रह धरला....

**सुनंदा :** बस्स. इतकंच ना? (आत जायला लागते.)

**सुधा :** हे.... बस्स इतकंच?

**सुनंदा :** तर काय?

**सुधा :** त्यानी काय सांगितलं हे नाही विचारलंत.

**सुनंदा :** ते काय सांगणार ते माहित आहे मला.

**सुधा :** तुमचा अंदाज चुकेल कदाचित्.

**सुनंदा :** शक्य नाही. माझ्या नवऱ्याला मी चांगला ओळखते. मी सांगू त्यानी काय सांगितलं ते? त्यानी स्पष्ट नकार दिला असणार. खरं ना?

**सुधा :** हो....

**सुनंदा :** माझ्या बायकोला मला दुखवायची नाही हे कारण दिलं असणार. माझा नवरा भेकड आहे हे मला माहित आहे. टिपीकल मध्यमवर्गीय मित्रं काळीज आहे त्याचं. बाहेर कुठंतरी रोमान्स करावा अशी आकांक्षा बाळगणारा, त्यासाठी धडपड करणारा, कुणीतरी गळयात पडावं म्हणून खडे टाकत फिरणारा पुरूष. जमेल तेवढं, जमेल तितकं थ्रिल अनुभवायचं आणि जबाबदारी घ्यायची वेळ आली की हात झटकून मोकळं व्हायचं याहून वेगळं काय करणार ते? परस्त्रीवर मनापासून प्रेम करायला आणि ते तडीस न्यायला गटस्

लागतात. माझ्या नवऱ्याच्या मर्यादा मला माहित आहेत. हे आपणहून घटस्फोट घेणं कधीच शक्य नाही हे माहित आहे मला. अंदाज चुकला नाही ना माझा?

सुधा : तुमचं बरोबर आहे.

सुनंदा : तुम्ही पुढं काय करायचं ठरवलं आहे?

सुधा : म्हणजे....?

सुनंदा : तुम्ही इथं कायमच रहाणं तुम्हाला किंवा मला दोघीनाही परवडण्यासारखं नाही. राग मानू नका. दोनचार दिवस ठीक आहे पण याहून जास्त औदार्य मी नाही दाखवू शकणार.

सुधा : मला जाणीव आहे त्याची. तुम्ही केलंय हेच खूप आहे.

सुनंदा : त्यात विशेष असं नाही. एक स्त्री म्हणून मला तुमची दया आली. तुमच्या जागी मी स्वतःची कल्पना केली आणि तुम्हाला ठेवूनं घेतलं पण ते तात्पुरतं होतं.... तुम्हाला तुमचा मार्ग शोधायला हवा. शक्य तितक्या लवकर.

सुधा : मला खरंच समजत नाही. मी कुठं जाऊ....? करू तरी काय?
(टेलीफोनची बेल वाजते. सुनंदा जाऊन टेलीफोन उचलते.)

सुनंदा : हॅलोऽ.... येऽस.... एक मिनीट.... (सुधाला) तुमच्याकरतां फोन आहे.... तुमच्या मिस्टरांचा....

सुधा : (धावत टेलीफोनपाशी जाते रिसीव्हर घेते. तिच्या तोंडून शब्द फुटत नाहीत) हॅलो.... हॅलोऽ.... मी.... मी.... बोलतेय.... होऽ.... काय.... खरं सांगताय तुम्ही हे....? हो....! हो.... नक्की.... थॅंक्यू. (फोन ठेवते)

सुनंदा : काय म्हणाले ते?

सुधा : त्यानी मला घरी परत बोलावलाय.... आजच्या आज....

[अंधार.... दृश्य समाप्त]

# अंक दुसरा [दृश्य — ४]

-अरूणच्या घराच्या दिवाणखाना, वेळ संध्याकाळची. अरूण दिवाणखान्यात एकटाच. शांतपणे सिगारेट ओढीत बसला आहे. दारवरची बेल वाजते. -

**अरूण :** बजाबाऽ.... दार उघडा. (बजाबा आतून येतो. दार उघडतो. पाठोपाठ सुधा प्रवेश करते. प्रवेश केल्याबरोबर एकदम थबकते. सारं घर डोळे भरून पहाते. आणि आत जायला लागते.) जरा बैस इथं.... (ती थबकते.) मला जरा बोलायचंय तुझ्याशी थोडसं....

**सुधा :** (मऊपणानं) नंतर बोललेलं नाही का चालायचं?

**अरूण :** नाही चालायचं. आताच बोललेलं बरं.... (ती बसते. टेन्स. एक डेड पॉझ. ती तो बोलेल या अपेक्षेत. तो बोलत नाही.... तीच अखेर बोलायला सुरूवात करते)

**सुधा :** मला माहित आहे तुम्हाला फार मनस्ताप झालाय. (तरीही तो गप्प) मीही गेल्या आठ दिवसात कमी नाही भोगलं.... (पुन्हा स्तब्धता) आय ॲम सॉरी. जे घडलं ते घडायला नको होतं. तुम्ही सारं विसरून आपणहून मला परत बोलावलतं त्याबद्दल....

**अरूण :** मी आपणहून तुला परत बोलावलं इतकच खरं आहे.

**सुधा :** म्हणजे तुम्ही....

**अरूण :** विसरून जाणं हे इतकं सोपं आहे....?

**सुधा :** म्हणजे तुम्ही काही विसरायला तयार नाही. हेच तुम्हाला सांगायचंय?

**अरूण :** हेच पण इतकंच नाही. पहिली गोष्ट मी काही विसरलेलो नाही.... आणि विसरणारही नाही. मी तुला क्षमा केलेली नाही. मी एक नवरा म्हणून सामान्य आणि क्षुद्र आहे. मी संत नाही, मी उदारही नाही. आणि औदार्याचं नाटक मला करतां येणार नाही. या घरात तुला मी पुन्हा घेईन ते ऑन माय टर्म्स ॲन्ड कंडीशन्स.

**सुधा :** टर्म्स ॲन्ड कंडीशन्स?

**अरूण :** येस टर्म्स ॲन्ड कंडीशन्स. नाती तुटतात तेव्हा उरतो फक्त करार आणि कराराला असतात फक्त अटी. पूर्वीप्रमाणे तुला या घरात पैसा, दागदागिने, कपडालत्ता यात काहीही कमी पडणार नाही. संसार, घरखर्च तूच चालवशील. तुझा आधिकार कुणीही काढून घेणार नाही किंवा तुझा अपमानही

करणार नाही. गरजेपुरतं आपण एकमेकांशी बोलायला हरकत नाही. समाजात चारचौघांत वावरताना 'आमचं छान चाललंय, वुई आर मेड फॉर इचअदर' हा मुखवटा कसोशीनं संभाळायचा मी प्रयत्न करीन. तुझ्यावर माझा विश्वास नसल्यामुळे यापुढं प्रत्येक प्रोग्रॅमला तुझ्याबरोबर मी किंवा प्राजक्ता असेल. आमच्यापैकी कुणालाही वेळ नसल्यास तू जायचं नाहीस. तुझ्या म्हणण्याप्रमाणं मी तुझ्यावर कधी प्रेम केलंच नाही. त्यामुळं यापुढेही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कुणाच्या मनाविरूध्द प्रेम नसतानां शरीरसुख ओरबाडून घेणं हे माझा स्वभावात बसत नाही त्यामुळं माझा नवरेपणाचा हा हक्क मी बजावणार नाही. ज्या गोष्टी मी मान्य केल्या आहेत त्यात माझ्याकडून चूक होणार नाही. ज्या गोष्टी तू करू नये अशी अपेक्षा आहे त्या करण्याचा मोह जेव्हां तुला होईल तेव्हा त्या करण्याआधी तू घराबाहेर पडायचं. या अटी तुला मान्य असतील तरच....

**सुधा :** संपलं तुमचं ? कां अजूनं काही राहिलंय?.... थोडक्यात तुम्ही माझी एक कळसूत्री बाहुली बनवणार. हे सांगण्यासाठी तुम्ही मला इथं बोलावलंत? माझ्या अशा जगण्याला काय अर्थ आहे?

**अरूण :** ज्या क्षणी तू स्वतःच्या सुखासाठी परपुरूषाच्या शेजेवर गेलीस त्या क्षणीच आपल नवराबायकोच नात संपलं. जगण्यातला अर्थ वगैरे जड जड गोष्टी मला समजत नाहीत. तू येच असा माझा आग्रहही नाही.

**सुधा :** झालं गेलं विसरून नवीन आयुष्य आपल्याला नाही सुरू करतां यायचं का?

**अरूण :** मला ते जमणार नाही हे मी एकदा सांगितलंय.

**सुधा :** मग मला परत कशाला बोलावलंत? माझ्यावर उपकार म्हणून?

**अरूण :** कुणावर तरी उपकार करण्या करता म्हणून मी मनाविरूध्द एखादी गोष्ट करीन असं वाटतं तुला?

**सुधा :** तुम्हाला काय साधायचंय तेच मला समजत नाही. तुम्ही खरंचं माझा इतका तिरस्कार करतां? मी पुन्हा तुमच्या आयुष्यात यावं असं नाही वाटत तुम्हाला?

**अरूण :** मी मनाविरूध्द फार मोठी तडजोड करतोय. तुला घरात घेतल्यावर तुझ्या रूपानं अविश्वासाचं चालतं बोलतं रूप या घरांत वावरणाराय. जे पदोपदी मला आठवण करून देणाराय माझ्यातल्या अपूर्णतेची. तुझं इथलं आस्तित्व कुत्सित हसणाराय माझ्या अहंकाराला आणि मी बाहेरच्या जगात मिळवलेलं यश घरात येताच केविलवाणं होणाराय तुला पाहून. एक स्त्री म्हणून मला तुझ्याकडून कांही नकोय. तसंच पत्नी म्हणूनही काहीही नकोय.

**सुधा :** तरीही तुम्ही मला बोलावलंत.... कशासाठी?

**अरूण :** प्राजक्तासाठी. ..!

सुधा : प्राजक्तासाठी?

अरूण : आशुतोषविषयी तिनं सांगितलंय तुला. त्याचे आईवडील त्याच्याकरतां मुली पहायला लागलेत. म्हणून त्यांनी घरी प्राजक्ताविषयी सांगितलं त्याचे आईवडील आपल्याला भेटायला येतील.... किंवा कदाचित् आपल्याला त्यांच्याकडे जावं लागेल. त्यावेळी आपली पोझिशन ऑकवर्ड होऊ नये म्हणून....

सुधा : प्राजक्तानं मला बोलवायला, घरी परत घ्यायला सांगितलं?

अरूण : नाही.... तिनं इतकंच सांगितलं, ममाविषयी त्यानी कांही विचारलं तर मी खरं ते सांगून टाकेन खोटं सांगणार नाही. तिच्यावर खरं सांगायची पाळी येऊ नये असं मला वाटतं....

सुधा : आणि म्हणून....

अरूण : हो केवळ म्हणूनच ! माझ्या लाडक्या प्राजक्ताचं आयुष्य बरबाद व्हायला नकोय मला. त्या कोवळया पोरीचा काय दोष? जीव गुंतवून बसलेय त्याच्यात. म्हणून मन मारून मी तुला परत बोलावलं. तुझ्या इथं असण्यानं प्राजक्ता अडचणीत येणार नाही. सारं सुरळीत होईल.

सुधा : परवा भेटली पण यातलं काही बोलली नाही.

अरूण : ती नाही बोलणार.

सुधा : पण मला इतक्या साऱ्या अटी कां घातल्यात?

अरूण : मी तुला क्षमा केलेय असा तुझा गैरसमज होऊ नये म्हणून. मला तुझ्यासारखी मुखवटे चढवून नाटकं करतां येत नाहीत. आपलं पूर्वीचं आयुष्य आपल्याला परत मिळणार नाहीये याची स्पष्ट जाणीव तुला मिळायला हवी म्हणून मी तडजोड इथपर्यंत करू शकतो. यापुढे नाही. आता निर्णय तुला घ्यायचाय. आणि आताच. (— एक दिर्घ स्तब्धता. अखेर तिच्या मनाचा निश्चय होतो ती शांतपणे पावलं टाकीत बेडरूमच्या दारापर्यंत येते इतक्यात मेनडोअरमधून प्राजक्ता प्रवेश करते —)

प्राजक्ता : ममाऽ.... तू आलीस ममा? (तिच्याजवळ धावत जाऊन मिठीत शिरते).....

सुधा : होय बेटा, मी आलेय. (भावनावेग ओसरल्यावर दूर होतात.)

प्राजक्ता : तुम्ही खूप चांगले आहात पपा. ममाला तुम्ही परत बोलावलंत. माझ्या खूप मनात होतं तुम्हाला सांगायचं की पपा ममाला परत बोलवा. तुम्हा दोघांचं भरकटलेलं आयुष्य आणखी भरकटत जाऊ नये म्हणून. पण मी नाही सांगितलं. वाटलं, तुम्हाला वाटेल माझा स्वार्थ आहे हे सांगण्यात, म्हणून.

पण तुम्ही आपणहून केलत हे. या घराचं घरपणं आता परत येईल. मला इतका आनंद झालाय पपा.... जुन सारं विसरून....

**अरूण :** एक मिनीट....

**सुधा :** कशाला उगाच.... काही नाही प्राजक्ता...

**प्राजक्ता :** तुम्ही माझ्यापासून काहीतरी लपवताय.

**सुधा :** त्यात काय लपवायचं?

**प्राजक्ता :** तेच मला जाणून घ्यायचाय. तू घरी परत आलीस ना?

**सुधा :** हो परत आलेय मी...

**प्राजक्ता :** पपा.... ममाला घरांत घेतलंय ना तुम्ही.... का...

**अरूण :** ममाला मी परत यायला सांगितलंय.

**प्राजक्ता :** मग...?

**अरूण :** पण तुला वाटतं तसा मी खूप मोठा नाही. तुझ्या ममानं केलेलं मी विसरणार नाही किंवा त्याला क्षमा केली नाही. करणारही नाही. मी तुझ्या ममाला फक्त अन्न, वस्त्र, निवारा विथ स्टेटस मायनस भावना इतकंच ऑफर केलाय.

**प्राजक्ता :** आणि ममानं स्वीकारलंय ते? (सुधा गप्प) कशासाठी तुम्ही ही ऑफर दिलीत.

**अरूण :** नाईलाजानं तडजोड म्हणून...

**प्राजक्ता :** तडजोड? ....कुणासाठी?

**अरूण :** तुझ्यासाठी...

**प्राजक्ता :** माझ्यासाठी?

**अरूण** होऽ तुझ्यासाठी. तू मला फक्त चार दिवसांची मुदत दिली होतीस आठवतं, नाहीतर तू विषय निघाला तर ममाविषयी सारं कांही खरं सांगून टाकणार होतीस आशुतोषच्या आईवडलांना. मला ते नको होतं. फार मोठं रिस्क होतं त्यात. तूं त्याच्यात इतकी गुंतली आहेस की... तुला दुखवणं बरोबर नाही वाटलं मला.

**प्राजक्ता :** म्हणून तुम्ही ममाला घरी आणलंत... (रूक्षपणे) थँक्यू पपा.... पण पपा याची गरज नव्हती ...

**अरूण :** म्हणजे.....?

**प्राजक्ता :** आशुतोषला नकार दिलाय मी

**सुधा :** काय सांगतेस काय?

**प्राजक्ता :** खरं तेच सांगतेय मी

**अरूण :** त्यांना तू सांगितलंस सारं...?

**प्राजक्ता :** ममा आणि श्रीकांतविषयी आशुतोषला आधीच माहिती होतं. फक्त ती बाई म्हणजे माझी आई हे त्याला ठाऊक नव्हतं. त्याच्या आईवडलांना काहीच माहिती नव्हतं पण ममा श्रीकांत अंकलकडे रहिला लागल्यापासून त्यांनाही कळलं....

**अरूण :** तुला हे सारं केव्हां समजलं?

**प्राजक्ता :** आजच.... घरच नांव कायमचं टाकायची अट घातली त्याच्या आईवडलांनी. म्हणाले मुलाची इच्छा म्हणून हे रिस्क घेतायत ते. तेही मी ऐकून घेतले. पण पुढे म्हणाले खाण तशी माती कशावरून निघणार नाही. मग मात्र माझा तोल गेला. माणसांना ही म्हण लागू पडती तर एकादष्ण्या करीत आयुष्य घालवलेले माझे आजोबा आणि माजघराचा उंबरासुद्धा जिनं कधी ओलांडला नाही ती माझी आजी यांच्यापोटी ममा कशी जन्माला आली असती. माझी योग्यता माझ्यावरून ठरवा. माझ्या आईचं चारित्र्य किंवा वडलांच कर्तृत्व यावर माझी योग्यता ठरवणारी माणसं मला नको आहेत.

**सुधा :** पण आशुतोष...

**प्राजक्ता :** शांतपणे सारं ऐकून घेत होता.

**सुधा :** आय ॲम सॉरी प्राजक्ता.... माझ्यामुळं...

**प्राजक्ता :** ममा असं कुणामळें वगैरे कुणाचं वाईट होत नसतं. दुसरं म्हणजे हे वाईट झालं असं मानायला मी तयार नाही मी सुखात आहे.

**सुधा :** म्हणजे... ?

**प्राजक्ता :** तुझ्या माझ्यातला आणखी एक फरक. आयुष्यभर तू सुखाच्या गोष्टी शोधीत फिरलीस.... आणि मी..... घडलेल्या प्रत्येक गोष्टीत सुख शोधते. जाऊ दे ममा. तर पपा हे असं आहे.... तुम्हाला ममा परत यायला कधीच नको होती. माझ्याकरता तिला परत आणावं तर त्याचीही गरज आता उरलेली नाही. तरीही तुम्ही ममाला परत घेणार आहात? (दारात आशुतोष. सर्वांच्या नजरा त्याच्याकडे वळतात. क्षणभर स्तब्धता अखेरीस. ..)

**सुधा :** अरे ये ना. .. (आत येतो. कुणालाच काय बोलावं क्षणभर सुचत नाही. तो प्राजक्ताजवळ येतो)

**आशुतोष :** मला प्राजक्ताशी बोलायचंय थोडसं.

**अरूण :** आम्ही आत जाऊ कां?

**आशुतोष :** त्याची काही गरज नाही. उलट तुम्ही इथं असलात तर जास्त बर. (प्राजक्ताला) मी '**थांब थांब**' म्हणत असताना ताड्ताड् निघून गेलीस?

**प्राजक्ता :** बोलण्यासारखं काही उरलं नव्हतं. सारं संपलं होतं.

**आशुतोष :** 'संपलं होतं' असं म्हटलं की सारं संपतं? (अरूण सुधाची नजरानजर)

**प्राजक्ता :** सारं चालू असताना तू अक्षरही बोलला नाहीस शांतपणे सारं पहात होतास.

**आशुतोष :** हे बघ प्राजक्ता, माणसं संतापून बोलतात तेव्हा मी गप्प रहातो. बोलण्यात काही अर्थ नसतो तेंव्हा.

**प्राजक्ता :** आधी मी ही शांतच होते ना? पण जेव्हा तुझी आई खाण तशी माती कशावरून निघणार नाही? असं म्हणाली.....

**आशुतोष :** तेव्हा तुझा तोल गेला. अंऽ ? अग आई तसं म्हणाली म्हणजे लगेच तू तशी होतेस? सांग ना? हे बघ प्राजक्ता, प्रत्येक माणसाच्या समजून घेण्याच्या, समजण्याच्या मर्यादा असतात. त्यानंतर तो आपल्या मनाची दारं बंद करून घेतो आणि आधींच्या कल्पनांना निष्कर्षांना चिकटून रहातो. त्यात माझी आई एक सामान्य स्त्री. तिचं मन, तिचे विचार, तिची मर्यादाच तेवढी. ''खाण तशी माती'' तीनच शब्द. पण तुझ्यासारख्या समंजस विचारी मुलीचा तोल घालवायला पुरेसे झाले.

**प्राजक्ता :** पण....

**आशुतोष :** एक मिनीट.... ! प्राजक्ता आपण कितीही विचारी असलो तरी एक क्षण.... एखादा शब्द.... एखादी लहानशी घटना आपला तोल घालवायला पुरेशी असते. त्या क्षणी आपण हळवे होतो किंवा संतापतो किंवा आपला अहंकार दुखावतो. आणि त्याची प्रतिक्रिया आपलं आयुष्य बिघडवून टाकू शकते. ... हे बघ, आईचं बोलणं मनावर घ्यायचं नाही. माझे निर्णय आईच्या विचारांवर अवलंबून नाहीत. मी एवढंच सांगतो मला तू हवी आहेस आणि कोणत्याही परिस्थितीत मी तुझ्याशीच लग्न करणार आहे.

(प्राजक्ता त्याचा हात घट्ट पकडते. तिला भावनावेग असह्य. वेगानं तिच्या रूमकडे जाते. पाठोपाठ आशुतोष)

**सुधा :** (बॅग उचलून जायला निघते)

**अरूण :** हे काय? तू कुठं निघालीस?

**सुधा :** माझी इथली गरज संपली आहे.

**अरूण :** तरीही तू इथं रहिलीस तरी माझी हरकत नाही.

**सुधा :** तुम्ही घातलेल्या अटींवर?

**अरूण :** सुधा....

**सुधा :** तुमच्या अटी मला नामंजूर आहेत. तुम्ही मला सन्मानानं वागवाल अशी अपेक्षा नव्हती माझी पण म्हणून इतकी अपमानास्पद वागणूक तुम्ही मला द्यायला नको

होती. मी चुकले, मला मान्य आहे. पण मी पुन्हा पुन्हा जीव तोडून सांगत होते की ते घडून गेलं. तो वेळच तशी होती. मी दुबळी झाले, मला मोह झाला. तो क्षण मला नाही टाळता आला, मोह काय कधी कुणाला होत नाही? कधी कुणी चुकत नाही? तुम्ही आयुष्यात कधी चुकला नाहीत का कधीच चुकणार नाही? घर आणि फॅक्टरी यात फरक करीत नाही तुम्ही. कामगारानं कर्तव्यात कसूर केली की तिथं ज्या कोरडेपणानं तुम्ही त्याला गेटवर बंद करता तितक्याच कोरडेपणानं तुम्ही बायकोला घराचं दार बंद करता. फार लॉजिकली बोलता तुम्ही आणि त्याचा तुम्हाला अहंकार आहे पण माणसं म्हणजे यंत्र नाहीत हे तुम्ही विसरता. बावीस वर्षाच्या संसारात तुम्ही मला वापरलीत मन नसलेलं बायको नांवाचं यंत्र म्हणून. श्रीकांतनं मला वापरली प्रेयसी म्हणून. आणि आता पुन्हा एकदा वापरू पहाताय घरात ठेवायला शोभेची वस्तू म्हणून. पण काचेच्या कपाटात बंद करून ठेवलेल्या बाहुलीचं जिणं मला जगायचं नाही. या घरात मला प्रेमच मिळणार नसेल तर.... ! तुमचं गुलाम होऊन रहाण्यापेक्षा मी हाल अपेष्टा पत्करीन. तुमच्या दिखाऊ औदार्यापेक्षा जगाची अवहेलना पत्करीन. पण या तुमच्या घरात 'मालकीण' नावाच्या मोलकरणीचं अपमानास्पद जिणं मी नाही जगणार. मी इथून निघून जातेय. कायमची. (ती बॅग उचलते. दारापर्यंत जाते)

**अरूण :** थांब सुधा.... मी माझ्या अटी मागे घेतल्या तर? (ती चकित. थांबते वळते. बॅग खाली ठेवते. अरूण दोन पावलं पुढे येतो. हात पुढे करतो. ती त्याच्याकडे येत असतानाच.... हळूहळू पडदा पडतो.)

[दृश्य समाप्त]

[अंक समाप्त]

IRBK-0123770

क्र. ८२३५५०
२६/५/९०
नाटक